सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ८ वे : अंक ४

जुलै २०२२

# मासिक नवस्नेह

स्वागतमूल्य
₹. 30/-



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

॥ श्री परशुराम प्रसन्न ॥

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012 फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225

आता कोल्हापूर चित्पावन संघाच्या नवीन वेबसाईटवर घरबसल्या सर्व ब्राह्मण पोटशाखेतील विवाहेच्छू तरुण तरुणींसाठी हजारो स्थळे पाहून आपल्या अनुरूप जोडीदाराची निवड करता येणार ! सर्व ब्राह्मण वधुवरांसाठी ही मोठी सुवर्णसंधीच म्हणावी लागेल!

- देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, कण्व, सारस्वत, देवरुखे, दैवज्ञ इ. सर्व ब्राह्मण पोटशाखांतील वधुवरांसहित मराठी, गुजराथी, कानडी व परप्रांतीय फक्त ब्राह्मण वधुवरांची घरबसल्या केव्हाही, कधीही आणि कितीही स्थळे पहाण्याची सोय !
- मोबाईलवर अधिकृत ॲपद्वारा वेबसाईट पाहण्याची सोय !
- अत्यंत गोपनीय व सुरक्षित वेबसाईट, सहज सोप्या पद्धतीने फॉर्म भरण्याची सुविधा !
- केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण देशातील आणि जगभरातील ब्राह्मण वधुवरांची नोंदणीकृत स्थळांची माहिती उपलब्ध !
- आकर्षक तीन सवलत योजनेत विवाहेच्छूंसाठी ही पॅकेज उपलब्ध आहेत.

१) **श्री परशुराम पॅकेज :- स्वागत शुल्क रु. २,०००/- (एक वर्षासाठी)**

या पॅकेजमध्ये तुम्हाला एक वर्ष ऑफलाईन व एक वर्ष इंटरनेट नोंदणी मिळेल. यामध्ये वर्षभरात नोंदणी होणाऱ्या सर्व स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. तसेच पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट' ची सुविधा मिळेल. आपले १० फोटो अपलोट करण्याची सुविधा शिवाय संस्थेच्या 'नवस्नेह' मासिकांत आपल्या स्थळाची माहिती एकदा प्रसिद्ध केली जाईल. याचबरोबर पंचरत्न वधूवर सूचक केंद्राकडून pancharatnavivah.co.in या वेबसाईटमधील १०० स्थळे सहा महिने मुदतीत मोफत पहायला मिळतील. (अधिक माहितीसाठी संपर्क : 9881291863)

२) **श्री योगेश्वरी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,५००/- (सहा महिन्यांसाठी)**

या पॅकेजमध्ये तुम्हाला सहा महिने इंटरनेट नोंदणी मिळेल. त्याचबरोबर या पॅकेजमध्ये तुम्हाला १२५ स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट'ची सुविधाही तुम्हाला मिळेल. आपले १० फोटो अपलोड करण्याची सुविधाही यामध्ये आहे.

३) **श्री महालक्ष्मी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,०००/- (तीन महिन्यांसाठी)**

यामध्ये नोंदणी करणाऱ्यांना तीन महिने इंटरनेट नोंदणी उपलब्ध असेल. ५० स्थळांचे संपर्क क्रमांक व माहिती मिळू शकेल. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. व 'चॅटींग' सुविधा तसेच आपले किमान १० फोटो अपलोड करता येण्याची सुविधाही या पॅकेजमध्ये देण्यात आली आहे.

उपवर ब्राह्मण तरुण तरुणींनी आजच नोंदणी करून या सवलतीच्या पॅकेजचा लाभ घ्यावा. आमच्या माध्यमातून आपला विवाह लौकरच संपन्न व्हावा या शुभेच्छा !

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक ४ : जुलै २०२२**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) संपादकीय /४
२) लौकिक दंतकथांचे वास्तव /५
– डॉ. सुश्मिता गाडगीळ
३) माझी सखी – कृष्णकुमारी/८
– प्रकाश गणेश गानू
४) छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ /९
– गुरुप्रसाद कानिटकर
५) शंभर टक्के /११
– कौस्तुभ ताम्हनकर
६) सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' / १२
– सौ. मंजुश्री गोखले
७) ज्ञानसूर्याची सावली /१४ – सौ. मंजुश्री गोखले
८) हिंदू /१७
९) लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात / १८ – इंद्राणी केळकर
१०) गोदावरी परिक्रमा /२१
११) ब्राह्मण समाज अभिमानास्पद व्यक्ती गौरव /२३
१२) वधूवर माहिती यादी /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०




सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611

**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ७ वर दिली आहे.**

# संपादकीय...

नमस्कार मंडळी,

हा अंक हातात पडेपर्यंत पाऊस मेहेरबान झाला असेल अशी आशा करूया. कारण जवळपास जून महिना तो दडी मारूनच बसलाय. बघूया, आता जुलै महिन्यात काय करतो ते ! दुसरी एक गंभीर बाब अशी की, कोरोना पुन्हा डोकं वर काढतोय. मागच्या दोन वेळच्या कटू आठवणी, सुहृदांचे वियोग आठवून या वेळी पूर्ण सावधगिरी बाळगूया. ते आपल्याच हातात आहे. ते करू आणि याही संकटाला पळवून लावू.

**जिंदगी में टेन्शन ही टेन्शन है ।**
**फिर भी लबों पर मुस्कान है ।**
**अगर हर हाल में जीना है,**
**तो मुस्कराकर जीने में क्या नुकसान है ।**

तेव्हा अगर मुस्कराए हुए जीना है, तो अपना और दुसरों का खयाल रखना ।

या अंकात एक नवीन विषय घेतला आहे. आपल्या सुस्मिता गाडगीळ या कृष्णकुमारी म्हणजे कोरफडीविषयी समग्र माहिती देत आहेत. ती आपल्याला कायम उपयोगी पडेल. आपला नवस्नेह संग्रही ठेवला जावा, हाच आमचा प्रयत्न असतो. हाच विषय दि. ११ जूनला झालेल्या नवस्नेहच्या लेखक मेळाव्यात चर्चिला गेला.

११ जूनला नवस्नेहच्या लेखकांचा स्नेहमेळावा आणि स्नेहभोजन असा कार्यक्रम आपल्या संघात झाला. सर्व लेखकांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. नवस्नेह मध्ये येऊन गेलेले आणि भविष्यात अपेक्षित असलेले विषय चर्चेत घेतले. लेखकांनी या स्नेहभेटीनंतर आनंद व्यक्त केला. कोविडमुळे दोन वर्षे न झालेल्या भेटीगाठी झाल्या याचं समाधान सगळ्यांच्या चेहऱ्यावर होतं. दरवर्षी असाच स्नेहमेळावा घेतला जाईल असं मनोगत चित्पावन संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे यांनी व्यक्त केलं.

या माध्यमातून मला नवस्नेहच्या वाचकांना आणखी एक आवाहन करायचे आहे. एक म्हणजे – नवस्नेहमध्ये आणखी कोणते विषय तुम्हाला अपेक्षित आहेत? तुमच्यापैकी कोणी त्या विषयावर नियमितपणे लिहून देऊ शकेल का? किंवा इतर काही लोकोपयोगी लेखन नवस्नेहसाठी देऊ शकेल काय? आणि दुसरी म्हणजे – आपल्याला नवस्नेहमधील काय आवडलं? कोणतं लेखन आवडलं? ते अभिप्राय पत्र किंवा व्हॉटस् ॲपद्वारे आमच्यापर्यंत पोहोचवा. ते अंकात नावासह छापले जाईल. कराल ना एवढं? दोस्तो,

**क्यों ना थोडा अलग बने?**
**किसी को खुश रहने की सलाह**
**देने के बजाय, वजह बने ।**

थांबते. धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**
**श्री. रोहित गवळी 9657963475**

# लौकिक दंतकथांचे वास्तव

**(लेखांक चवथा)**

माणूस प्रगतीच्या एका टप्प्यावर असताना त्याला अनेक गोष्टींचे भय वाटत असे. कोणत्याही प्रकारचे भय वाटल्यानंतर तो दोन पातळ्यांवर त्यावरच्या प्रतिक्रिया देत असे. एक जाणिवेच्या आणि एक नेणिवेच्या. यातील उपजत प्रतिक्रिया म्हणजे नेणिवेच्या पातळीवरची. ती झटकन दिली जाते. यात विचार नसतो. परंतु, तर्कबुद्धी वापरून म्हणजे जाणिवेच्या पातळीवरची प्रतिक्रिया ही प्रगत मानवाची खूण आहे. उदा. दोरी दिसली की साप, साप म्हणून पळणे किंवा नीट पाहून खात्री करून, सावधपणे ती वस्तू निरखून दोरी की साप आहे यावर आपली प्रतिक्रिया देणे. माणूस प्रगत झाला तरी अजूनही दुर्दैवाने काही गोष्टीत तो अप्रगतच राहिला आहे. मानवाचा मेंदू विकसित होऊनही हजारो वर्षे लोटली आहेत. पण अजूनही कधी कधी तो इतर जातीच्या प्राण्यासारखा वागतो. आदिमानवासारखा वागतो. झालेली प्रगती विसरून नको त्या दंतकथांवर विश्वास ठेवतो आणि चार पावले मागे हटतो. रूढी, परंपरा, विधी, पूजा अर्चा, व्रतवैकल्ये या सर्व गोष्टी मनाच्या समाधानासाठी करायला सुरुवात झाली. परंतु मनुष्य नंतर त्यात अडकत गेला. त्यामुळे स्वत:चेच आर्थिक, मानसिक नुकसान होत आहे या गोष्टीकडे त्याने दुर्लक्ष्य केले. आपण प्रत्येक गोष्टीचा विवेकाने विचार करायला हवा. प्रत्येक गोष्टीमागचे विज्ञान चौकस बुद्धीने जाणून घ्यायला हवे.

**अवर्षण–प्रतिबंध व चांगला पाऊस**

सध्या पावसाचे दिवस आहेत. सहा ऋतुंचे चक्र हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. वातावरणात, पर्यावरणात होणाऱ्या बदलांमुळे या ऋतुंची नियमितता थोडी खंडित होणे नैसर्गिकच आहे. पाऊस कमी–जास्त पडणे हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. आता उपग्रहांच्या मदतीने पाऊस केव्हा, कुठे, कसा पडेल हे काटेकोरपणे सांगता येते. सध्या तर ते आपल्या हातात आहे – मोबाईलच्या माध्यमातून. परंतु अजूनही पाऊस कमी जास्त पडला तर लोक विविध प्रकारचे विधी करतात. पाऊस चांगला पडावा यासाठी असे उपाय करतात – महादेवाचे लिंग पाण्यात बुडविणे. एका पाटावर मातीचे शिवलिंग करून ठेऊन तो पाट एका नागव्या मुलाच्या डोक्यावर ठेवतात. तो घरोघर फिरतो – लोक त्यावर पाणी वाहतात. असेच डबक्यातील दगड आणूनही करतात. उंच पर्वतावर चढण्यास यश आले तर पाऊस पडतो. पवित्र पर्वतावरील दगडाची पूजा करतात. हर्शद नावाच्या देवीला स्नान घालून तिला खिरीचा नैवेद्य दाखवल्याने पाऊस पडतो अशी समजून आहे. शृंग नावाच्या ऋषीची मूर्ती बनवून तिची पाण्यात स्थापना करतात व त्यापुढे होम हवन मंत्र म्हणतात. जेव्हा भयंकर अवर्षण पडते तेव्हा इंद्रदेवाची आराधना करण्यासाठी 'इंद्र महोत्सव' नावाचा उत्सव करतात. नरसी मेहता या संतांनी रचलेली मेघ रागातली चीज म्हटल्याने पाऊस पडतो अशी समजूत आहे. तसेच या रागानंतर दुसऱ्या रागातील चीज म्हटली की पाऊस थांबतो असेही म्हणतात. ही दंतकथा गुजराथमध्ये प्रचलित आहे. काही जातींमध्ये पाच स्त्रिया मातीचा गोळा एका पाटावर ठेवून वेलीच्या पानांनी झाकतात. त्याला 'मेहुलो' म्हणतात. हा पाट डोक्यावर ठेवून दारोदार त्याची फिरून पूजा करतात. ग्रामदवेतेच्या पूजेअर्चेत खंड पडल्यास दुष्काळ पडतो अशी समजूत आहे. अशा वेळी त्या देवतेस निरनिराळे बळी देऊन संतुष्ट करतात. चांगला पाऊस पडावा म्हणून काही ठिकाणी एखाद्या इसमास 'गोवाला देव' करून त्याला पूजतात. 'धोंडलदेव' नावाच्या देवाची मूर्ती करून पूजा करतात. नवचंडिका देवीची आराधना करतात. रायगड जिल्ह्यात वरसाई येथे प्रतिमा कोरलेला एक मोठा दगड आहे. हा दगड सरळ धरून मागे–पुढे हलविला की जोराचा पाऊस पडतो. अशी काही लोकांची समजूत आहे. कैकाडी/ओड जातीच्या

एखाद्या मुलाला बोलावून 'धोंडिलजग्या' नावाचा एक विधी पाऊस पडण्यासाठी करतात. हे सर्व विधी सामान्य वाटू शकतात. परंतु काही विधी तर अगम्यच आहेत. कर्नाटकात एके ठिकाणी देवीच्या मंदिराभोवती बाजार भरवतात. पाच आठवड्यात देवळाभोवती भरपूर केरकचरा साठतो. त्या घाणीला कंटाळून देवी पाऊस पाडते म्हणे ! कोडाने मेलेल्या माणसाचे प्रेत उकरून नदीत टाकले असता पाऊस पडतो अशीही समजूत त्या प्रांतात आहे. उभ्याने लघुशंका केल्यास पाऊस पडतो असेही काही ठिकाणी मानतात. मला सांगा, या सर्व विधींमागे, समजुतींमागे कोणता तर्क आहे?

**पाऊस थांबण्यासाठी पुढील विधी, उपाय करतात**

फाल्गुन महिन्यात जन्मलेल्या इसमाच्या तंगड्यांतून निखारे काढून ते पावसाच्या पाण्यात टाकतात. अशा इसमाला एका झाडाच्या पानात पावसाचे पाणी घेऊन ते काठीला बांधून छपरावर ठेवायला लावतात. ग्रामदेवतेच्या देवळाला तोरण बांधून उत्सव साजरा करतात. शेतीची कामे बंद ठेऊन 'मेघ' नावाचे लाडू करून खातात. पाऊस थांबण्यासाठी देवाला बळीही देतात. कित्येक ठिकाणचे लोकं अतिवृष्टी थांबावी म्हणून 'अलद्रा' नावाचे व्रत करतात. या व्रतासाठी एखादा इसम निवडून दिवस ठरवतात. त्या दिवशी गावातील सर्व व्यवहार, स्वयंपाक बंद करून उपवास करतात. भजन करतात. अशा उपायांनीही पाऊस थांबला नाही आणि गाव बुडून जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली असता गावचा प्रमुख समारंभाने गावाच्या सीमेवर जातो आणि तिथल्या पुराच्या पाण्यात काही पदार्थ अर्पण करतो. काही ठिकाणी एक अघोरी प्रकार करतात. मनुष्याच्या हाडांचा चरखा तयार करतात. हा चरखा एक नग्न पुरुष उलट दिशेने फिरवतो. अशाने पाऊस थांबतो असे समजतात. कर्नाटकात असाच अघोरी उपाय करतात. धनगर लोक गारांची वृष्टी थांबवण्यासाठी काळ्या रंगाच्या मेंढीचे मागचे पाय धरून तिला डावीकडून उजवीकडे ओढत नेतात आणि ज्या दिशेला गारा जाव्यात असे वाटत असेल त्या दिशेला तिला फेकून देतात.

खानदेशात बारी, कुणबी आणि धनगर पावसाची अतिवृष्टी थांबविण्यासाठी आपल्या करांगुळ्या कापून त्यातून गळणाऱ्या रक्तावर मंत्र म्हणतात. तसेच अतिवृष्टीमुळे पानमळ्याची नासाडी होऊ नये म्हणून आपल्या करांगुळीचे रक्त मळ्यांच्या हद्दीवर शिंपडतात. कसातिया नावाच्या देवाच्या नावाने 'कसातियाची गाठ बांधणे' या नावाचे व्रत केले असता पाऊस थांबतो अशीही समजूत आहे. हे व्रत तीन आठवडे चालते. कधी कधी शेतकरी जळत्या विस्तवाने पावसाला डाग देतात. म्हणजे विस्तव पावसात धरतात. किती ही भोळी समजूत ! पाऊस थांबविण्यासाठी समुद्राच्या नावानेही व्रत करतात. पाऊस थांबविण्यासाठी नागव्या मुलाकडून पावसात निखारे टाकतात. तसेच इरले खालची बाजू वर करून पावसात भिजवतात. होलिका देवीची आराधना करतात. जेथे चार रस्ते मिळतात, त्या ठिकाणी आवळीच्या फांद्या ठेवून त्यावर दगडांची रास करतात आणि एखाद्या नागव्या मुलाकडून घराच्या वळचणीवर त्याला काठ्या मारायला लावतात. काही पंचाक्षरी लोकांना मंत्राच्या बळाने पाऊस थांबविता येतो अशीही समजूत प्रचलित आहे. पाऊस चांगला होण्यासाठी अथवा अतिवृष्टी थांबावी म्हणून अनेक विधी, उपाय करतात. परंतु या सर्वात एक गोष्ट सारखी वाटते, ती म्हणजे विधी नागव्याने करावा असे समजतात. म्हणजे 'नंगे से खुदा भी डरता है ।' या उक्तीप्रमाणे होईल असे मानतात की काय !

**रोगप्रतिबंध (गुरांसाठी)**

गुरांना रोग होऊ नये म्हणून महाराष्ट्रामध्ये, ज्या पाण्यात मासे धुतले असतील त्या पाण्याने गुरांना न्हाऊ घालतात. यामुळे रोगाचा प्रतिबंध होतो अशी समजूत आहे. कित्येक ठिकाणी, गोरखदेवाच्या कोपामुळे गुरांना रोग होतो अशी समजूत आहे. त्याला प्रसन्न करण्यासाठी, रोग झालेल्या गुरावरून 'गोरखदेव प्रसन्न होवो' असे म्हणत सात वेळा आकडीची पाने ओवाळतात आणि त्यास एक नारळ वाहतात. रोगाने

मेलेल्या गुरास गावाच्या वेशीजवळ पुरले असता, ज्या रोगाने ते मेलं असेल तो रोग पसरत नाही असे मानतात. गुरांचे रोग शिवाच्या विशीमध्ये विशेषत: उद्‌भवतात असे म्हणतात. वीस वर्षाच्या काळास 'विशी' म्हणतात. आणि तीन विशांचा एक संवत्सर होतो. या तीन विशास अनुक्रमे 'ब्रह्माची विशी', 'विष्णूची विशी' आणि 'शिवाची विशी' अशी नावे आहेत. ब्रह्माच्या विशीत उत्पत्ती होते. विष्णूच्या विशीत संवर्धन होते आणि शिवाच्या विशीत नाश होतो. या शेवटच्या विशीतच प्लेक, दुष्काळ, गुरांचे रोग इ. आपत्ती ओढवतात असे मानण्यात येते. गुरांस खुरांचे अथवा तशाच प्रकारचे दुसरे रोग झाले म्हणजे गावाच्या वेशीवर एक नांगर पुरतात. त्यांवर तीन रस्त्यांवरून आणलेली धूळ ओततात आणि त्याला एका झाडाची फांदी, एक लोखंडाचा थाळा आणि शेंदूर वाहून त्याची पूजा करतात. हा विधी रविवारी अथवा मंगळवारी नागव्याने करावा लागतो. वलो रोग (ह्यात गुरांच्या घशास सूज येते) बरा करण्यासाठी, रोग झालेल्या जनावरांच्या मानेस अथवा शिंगास कुकडवेलीच्या देठांचे तुकडे बांधतात आणि त्याला दोन, तीन दिवस तूप आणि गूळ याशिवाय कोणतेही अन्न घालत नाहीत. कधी कधी रोगी जनावराच्या पाठीवर मूठभर मीठ टाकतात. तिळाच्या तेलाचाही ह्या रोगात चांगला उपयोग होता असे म्हणतात.

शेतकरी बांधव आपल्या गुरांना घरातील एका सदस्या प्रमाणेच मानतात. अशा वेळी रोग झाल्यावर त्या गुराला पशु वैद्याला दाखवावे हेच उत्तम नाही का? सध्याच्या काळात तर लहान लहान खेडेगावातही पशूवैद्यकिय दवाखाने सरकारने उघडले आहेत व त्यात चांगली सेवा देत आहेत. वरील एखाद दुसरा उपाय सोडला तर सर्व अंध:श्रद्धाच आहेत. अशाने 'रोगापेक्षा इलाज भयंकर' असेच व्हायचे !

**– सुधीर दाजी जोशी,**


मोबा. ९८२२२९८७२६


**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**


**दिनविशेष (जुलै, २०२२)**
**आषाढ-श्रावण शालिवाहन शके १९४४**
**प्लवनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शुक्रवार दि. १ :** डॉक्टर्स डे, महाराष्ट्र कृषी दिन, **रविवार दि. ३ :** विनायक चतुर्थी, **गुरुवार दि. ७ :** दुर्गाष्टमी, **रविवार दि. १० :** देवशयनी आषाढी एकादशी, बकरी ईद, **मंगळवार दि. १२ :** महाराष्ट्रीय बेंदूर, पौर्णिमा, **बुधवार दि. १३ :** गुरुपौर्णिमा, वीर शिवा काशीद पुण्यदिन, **गुरुवार दि. १४ :** वीर बाजीप्रभू देशपांडे पुण्यतिथी, गोपाळ गणेश आगरकर जन्मदिन, **शनिवार दि. १६ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो.९.४५), **सोमवार दि. १८ :** लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुण्यदिन, सरखेल कान्होजी आंग्रे पुण्यदिन, **मंगळवार दि. १९ :** बालमुकुंद बालावधूत पुण्यतिथी, **शनिवार दि. २३ :** वनसंवर्धन दिन, लोकमान्य टिळक जयंती, **मंगळवार दि. २६ :** शिवरात्री, संत नामदेव महाराज पुण्यतिथी, **बुधवार दि. २७ :** आमावास्या, **गुरुवार दि. २८ :** गुरुपुष्यामृत, **शुक्रवार दि. २९ :** श्रावण मासारंभ,

# माझी सखी – कृष्णा कुमारी

आपलं जिच्याशी सख्य असेल ती आपली सखी, असं म्हणायला हरकत नाही, नाही का? परंतु ही जरी माझी प्रिय सखी असली तरी मात्र ती, मानव देहधारी सखी नसून निसर्गदत्त, धरणी मातेने जन्माला घातलेली कुमारी तथा कोरफड आहे.

कोरफडीला क्वचितच फूल येते. अतिशय सुंदर असे फूल असते. परंतु तिला फळ येत नाही, म्हणून तिला कुमारी म्हणतात. शिवाय कोरफडीचा गर वाळविल्यानंतर अगदी कोळशासारखा काळा असा घट्ट गोळा तयार होतो .म्हणूनही कदाचित तिला कृष्णा असे नाव पडले असावे.

कोरफड ही सहजासहजी कुठेही वाढू शकते. शिवाय तिला देखभाल सुद्धा फारशी काही करावी लागत नाही. थोडेसे ऊन्ह मिळाले की पुरेसे होते. आणि पाणीही दोन चार दिवस मिळाले नाही तरी चालू शकते. अशी ही सर्व प्रकारच्या हवामानाशी जमवून घेणारी वनस्पती आहे.

नुसतीच कुठेही वाढते आणि देखभाल ही करावी लागत नाही म्हणून ती माझी लाडकी आहे असं नव्हे. ती फार गुणाची आहे. तिच्या सेवनाने यकृताचे काम उत्तम प्रकारे सुधारते. त्यामुळेच ती पित्तशामक, शरीरातली उष्णता कमी करणारी आहे. तिच्या सेवनाने मलावरोधाची तक्रार दूर होते. अर्थातच त्यामुळे मूळव्याधीसारखे विकार लवकर बरे होतात. डोळे उष्णतेमुळे लाल झाले असतील तर कोरफडीचा गर पापण्यांवर ठेवल्यावर डोळ्यातील उष्णता कमी होते. त्यामुळे डोळ्यांची लाली कमी होऊन डोळ्यांना थंडावा सुद्धा येतो. बऱ्याच वेळा कोरफड केसांना सुद्धा लावली जाते. त्यामुळे केसांना तर मऊपणा येतोच, परंतु डोक्याचा–मेंदूचा सुद्धा दाह कमी होतो.

कोरफड मुख्यतः दोन प्रकारे वापरली जाते एक म्हणजे वरचे जाड हिरवी साल काढून टाकून आतला गर चावून खाणे आणि दुसरं म्हणजे कोरफडीचा रस काढून साखर किंवा मध घालून चाटण म्हणून घेता येते. खोकल्यासाठी मुख्यतः अशा प्रकारचे चाटण घेणे योग्य ठरते, तर पोट साफ होण्यासाठी आणि पित्ताचा त्रास कमी होण्यासाठी कच्ची कोरफडच चावून खाणे श्रेयस्कर ठरते.

अनेक विकारांमध्ये उपयोगी पडणारे असे कुमारी आसव कोरफडीपासून तयार करतात. मात्र आपल्याला घरच्या घरी हे करणे अतिशय अवघड कठीण आहे. अनेक आयुर्वेदिक औषधी कंपन्या हे औषध तयार करीत असतात.

स्त्रियांच्या बाबतीत गर्भाशयाच्या अनेक विकारांवर हे कुमारी आसव अत्यंत उपयोगी ठरते. बाळंतपणानंतर स्त्रियांसाठी हे एक उत्तम औषध आहे.

आत्तापर्यंत त्याचे औषधी उपयोग तुम्ही वाचलेत. परंतु या कोरफडीपासून चविष्ट असे पदार्थ सुद्धा तयार करता येतात.

कोरफडीचा रसामध्ये साखर घालून, शिजवून, त्यात थोडे लिंबू  पिळून कोरफडीचा उत्तम आणि चविष्ट असा सुधारस तयार होतो. पोळी किंवा ब्रेड बरोबर खूप छान लागतो. कोरफडीचा कडवटपणा जाणवत नाही. मी आजवर अनेकांना दिला आहे .सर्वांनी अगदी आवडीने खाल्ला.

मी त्याचा आणखी एक पदार्थ करते .तो म्हणजे कोरफडीचे लाडू! कोरफडीच्या रसामध्ये साखर घालून साखर चांगली विरघळून घ्यावी. नंतर रवा किंवा गव्हाचं भरड पीठ घेऊन त्यामध्ये ओला नारळ  घालून खरपूस भाजून घ्यायचं. नंतर कोरफडीचा पाक आणि भाजलेले पीठ किंवा रवा दोन्ही जिन्नस गरम असतानाच एकमेकात मिसळावेत. हवी असल्यास वेलचीपूड आणि काजू घातले तरी चालेल. हे लाडू सुद्धा खूप रुचकर लागतात.

अशा प्रकारे या चविष्ट पदार्थांच्याद्वारे कोरफडीचं सेवन आपल्याला सहजपणे अगदी आनंदाने करता येणं शक्य होतं.

मग अशी ही बहुगुणी कोरफड माझी मैत्रीण का बरं असणार नाही? तुम्हीही तिच्याशी दोस्ती अवश्य करू शकता!

**– डॉ. सुश्मिता गाडगीळ**
मोबा. ९४२१२९०४७७

# छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ

## (लेखांक दुसरा)

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ६ जून १६७४ रोजी शिवाजी राजांचा राज्याभिषेक झाला. ते सिंहासनाधीश्वर झाले. स्वत: छत्रपती झाल्यानंतर राजांनी स्वराज्याच्या राज्यकारभाराचा आराखडा तयार केला. वेगवेगळ्या क्षेत्रासाठी वेगवेगळ्या माणसांची नेमणूक केली. त्यात अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. जाती पातीच्या पलिकडे जाऊन राजांनी स्वराज्याशी असलेली निष्ठा, पराक्रम, बुद्धीचातुर्य आणि ईमानीपणा याच आणि याच गुणांचा केवळ विचार केला आणि अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. या अष्टप्रधान मंडळाच्या सहाय्याने राजांनी अत्यंत यशस्वी आणि दक्ष राज्यकारभार केला. या अष्टप्रधान मंडळात सात जण ब्राह्मण होते. त्यांची नावे अशी – १. पंतप्रधान : मोरोपंत त्रिंबक पिंगळे, २. पंत अमात्य : रामचंद्र निलकंठ, ३. पंत सचिव : अण्णाजी पंत दत्तो, ४. मंत्री : दत्ताजीपंत त्रिंबक, ५. सेनापती : हंबीरराव मोहिते, ६. पंत सुमंत : रामचंद्र त्रिंबक, ७. न्यायाधीश : निराजीपंत रावजी, ८. पंडितराव दानाध्यक्ष : मोरेश्वर पंडित.

**'प्रधान अमात्य सचिव मंत्री, सुमंत न्यायाधीश धर्मशास्त्री, सेनापती त्यात असे सुजाणा, अष्टप्रधानी शिवमुख्यराणा'**

मागील लेखात आपण या अष्टप्रधान मंडळापैकी पंतप्रधान : मोरोपंत त्रिंबक पिंगळे यांची माहिती वाचली. या लेखात छत्रपतींचे अष्टप्रधान मंडळातील पंत अमात्य 'निळो सोनदेव (रामचंद्र निलकंठ)' यांच्याबद्दल उपलब्ध असलेली माहिती आपण घेणार आहोत.

**निळो सोनदेव :**

(?– १६७२). छ. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील अमात्य. त्यांचे उपनाम भादाणेकर. त्यांच्या जन्म-मृत्यूच्या तारखांबाबत निश्चित माहिती सापडत नाही. यांचे मूळ गाव ठाणे जिल्ह्यात कल्याणजवळ होते. निळोपंतांकडे पूर्वापार देशमुखी वतन होते. १६५७ सालापासून निळोपंत छ. शिवाजी महाराजांच्या सेवेत होते. त्यांच्या वडिलांचे नाव सोनाजी नारायण भादाणेकर.

यांचे आजोबा नारोपंत हे मावळांत खेडेवारें येथें ठकारांच्या घरी लहानाचे मोठे झाले. त्यांनी मालोजी राजांच्या पदरी नोकरी करून लौकिक संपादिला. त्यांचे पुत्र सोनोपंत, हे शहाजी राजांच्या पदरी होते व कर्नाटकांत राज्यव्यवस्थेच्या कामीं त्यांना सहाय्यभूत झाले. त्यांच्याकडे डबिरीचें काम असे. शिवाजी महाराजांना पुण्याची जहागीर स्वतंत्रपणे पाहावयास लावण्याच्या वेळी शहाजी राजांनी शिवाजी महाराजांच्या बरोबर जी विश्वासाची मंडळी दिली त्यात सोनोपंत होते. शिवाजी महाराजांनी सोनोपंतास तेंच काम सांगितलें होतें. औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असतां शिवाजी महाराजांनी मुघलांच्या विरुद्ध ज्या मोहिमा केल्या होत्या त्याच्या परिमार्जनासाठी सोनोपंतांस औरंगजेबाच्या दरबारीं अनेकदां पाठविलें होतें व कांहीं दिवस त्याना वकील म्हणूनहि नेमलें होतें. शिवाजी महाराजांच्या पहिल्या मसलतींत व कार्यांत त्यांना सोनोपंतांचा पुष्कळ उपयोग झाला. इ. स. १६४५ मध्ये सोनोपंतांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा निळोपंत या वडील मुलास शिवाजी महाराजांनी सचीव केले. निळोपंत व त्यांचे धाकटे भाऊ आबाजी हे दोघेहि वडिलांच्या हाताखालीं व शिवाजी महाराजांच्या देखरेखीखालीं तयार झाले होते. कोंकण वगैरे प्रांताची व्यवस्था चांगली लाविल्यामुळें यांना मुजुमदारी मिळाली (१६४७). त्यांचा भाऊ आबाजी ही पराक्रमी होता; त्यांनी कल्याण सुभा घेतला होता (१६४८) व पुढें तर कल्याणपासून थेट गोव्यापर्यंतचा

मुलूख हस्तगत केला; तेव्हां त्यांना या प्रांताचा सुभेदार नेमण्यांत आलें. पुढे (१६६१) शिवाजी महाराजांनी स्वराज्याची जी नवीन व्यवस्था ठरविली, त्यात निळोपंतानी लढाईवर न जातां मुलकी कारभार पहावा असें ठरविलें; तत्पूर्वी त्यांनाही पेशव्यांप्रमाणें लढायांवर जावें लागत असे. सीद्दीवरील लढायांत त्यांनी प्रमुख भाग घेतला होता. त्यावेळची राज्याची हिशेबी पद्धत निळोपंतांच्या हातची आहे. सिंहगडावरील एका फितव्याच्या (कारस्थान) प्रसंगी महाराजांनी निळोपंत यांना फितुरांना शिक्षा करण्यासाठी पाठविले होते (१६६३). तसेच सुरत लुटीच्या वेळी निळोपंत महाराजांबरोबर होते (१६६४). शहाजीराजांच्या मृत्यूची बातमी आली तेव्हा, जिजाबाई यांनी सती जाण्याचा निर्णय घेतला. तेव्हा निळोपंतांनी चार समजुतीच्या व उपदेशाच्या गोष्टी सांगून मोठ्या प्रयत्नाने त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. दिलेरखान व मिर्झा राजे जयसिंह हे स्वराज्यावर चालून आले, तेव्हा मोरोपंत, अण्णाजी दत्तो व निळोपंत यांनी लढाई न करता तह करण्यासाठीचा सल्ला दिला (१६६५). या तहाने जेव्हा छ. शिवाजी महाराजांना आग्र्यास जावे लागले, तेव्हा पाठीमागे या तिघांनी राज्याची व्यवस्था उत्तम राखली होती. त्यामध्ये निळोपंतांचा मोठा सहभाग होता.

पुरंदरच्या तहाने गेलेले किल्ले परत मिळविण्यासाठी छ. शिवाजी महाराजांनी नेमून दिलेल्या कामगिरीवर निळोपंत आघाडीवर होते. निळोपंतांनी ही कामगिरी पार पाडताच त्यांना लगेच बसरूरच्या स्वारीवर पाठवले. त्या प्रदेशातील कामगिरी उत्तम प्रकारे निळोपंतांनी पार पाडली. छ. शिवाजी महाराजांनी त्यांचे पुत्र रामचंद्रपंत यांना सिंधुदुर्ग किल्ल्याची सबनिशी दिली. निळोपंतांनी १६६८ ते १६७० या काळात राज्यकारभाराच्या नियमांबरोबर सरसालाचे हिशोब तपासण्याचे आणि त्यांविषयी नियम तयार करण्याचे काम केले.

याप्रमाणें त्यांनी मराठ्यांच्या राज्याची साधारण ३२ वर्षे सेवा केली.त्यांचे इ.स १६७२ मध्ये निधन झाले. अशाप्रकारे मुलकी व लष्करी दोन्ही कामात अत्यंत निष्णात अश्या व्यक्तीच्या निधनामुळे मराठ्यांच्या राज्याची हानी झाली. त्यांचा विवाह खेडबारे येथील गोविंदपंत कोडोलकर यांच्या कन्येशी झाला होता, त्या देवरुख येथे मृत्यू पावल्या. देवरुख गाव निळोपंतांना छ. शिवाजी महाराजांकडून इनाम मिळाले होते.

**संदर्भ :**


- सभासद : शिवदिग्विजय बखर
- श्रीमंत पंत अमात्य संस्थान बावडा यांचे वंशवृत, रामचंद्र महादेव गोरे,
- मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ८.



**– गुरुप्रसाद कानिटकर,**

मोबा. ७७५५९१३७९१



**परशुराम पतसंस्था कार्यालयीन वेळ**
**सकाळी १०.०० ते सायं. ५.००**
**देवघेवीची वेळ**
**सकाळी १० ते ४.३० पर्यंत**

**'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.**

**सभासदांसाठी भक्तनिवास नोंदणी विनामोबदला**

आपली गैरसोय टाळण्यासाठी कोल्हापूर मुक्कामासाठी आपल्या भक्तनिवासाची आगावू नोंदणी करा.
तात्काळ नोंदणीसाठी **संपर्क : श्री. गिरीश जोग फोन : ९४०४६०९५९७, ९८२२०३८८९७**
येताना आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स अशा फोटो व पत्ता असणाऱ्या शासकीय दस्तऐवजाची प्रत जमा करणे आवश्यक आहे.

# शंभर टक्के

शंभर टक्के बरोबर असे कांहीच नसते. अगदी सोन्याची शुद्धता देखील ९९.९९९ टक्केच असते. असं का?कारण ते तसच असायला हवं. शंभर टक्के हे ध्येय असते आणि ध्येय हे असाध्यच असते. ते कधीच गाठता यायला नाही पाहिजे . कारण जर का ध्येय साध्य झाले तर ध्यास संपेल आणि पुढे काय? असा मोठा गहन प्रश्न पुढे उभा ठाकेल. १०१ टक्के नसतातच.

समाजात प्रत्येक जण कशाचा तरी ध्यास घेऊन जगात असतो. कोणी नृत्याचा, कोणी रंगाचा, कोणी अभिनयाचा, कोणी खेळाचा तर कोणी शिकवण्याचा तर कोणी विजय मिळवण्याचा ध्यास घेऊन आपले जीवन जगत असतो . कला आणि छंद यांची या जगात कमतरता नाही. कला आणि छंदांवर कलाकलानेच प्रभुत्व मिळवता येते. छंदाचे बीज बालपणीच पेरले जाते. त्या बीजाला अंकुर कधी फुटेल हे मात्र सांगता येत नाही.

माझ्या एका मित्राला कविता करायचा छंद होता. र ला र आणि ट ला ट जुळवले की झाली कविता अशी त्यावेळी त्याची समजूत होती. आम्ही मुले त्याला कविराज म्हणून हाक मारायचो. मुलांचे जरी ते चिडवणे होते तरी त्याच्या लेखी ते कौतुकच होते. आता वाटते आम्ही त्या मुलाचा का उपहास करत होतो?

कारण सर्वात सोपे असते ते एखाद्याला नावे ठेवणे . मित्राचे सतत काव्यात बोलणे आम्हा मुलांना त्यावेळी त्रासदायक वाटायचे. आम्ही त्याला वेडा म्हणायचो. त्यावेळी त्याला नावे ठेवताना आपल्याला असे काव्यात बोलता येते का? किंवा येईल का? हा विचार सुद्धा मनाला शिवला नव्हता . आज तोच मित्र एक प्रतिथयश कवी आहे. त्याच्या नावावर चारपाच पुस्तके आहेत. गाडी, बंगला, बँक बॅलन्स असल्या दर्शनी मालमत्ता त्याच्याकडे नाहीत पण त्याची प्रतिभा हीच त्याची दौलत आहे आणि त्यात तो खूष आहे .

माझी एक मैत्रीण आहे. तिला स्वच्छतेची आवड आहे. स्वच्छता हाच तिचा छंद आहे. तिचे घर ती कायमच लखलखीत ठेवते. दुसऱ्याचे अस्वच्छ वागणे बघितले की ती अस्वस्थ होते. न पुसलेले टेबल बघितले की आपसूक तिचा हात टेबलावरील धूळ पुसण्यासाठी शिवशिवतो. लोक तिच्या स्वच्छतेला नाव ठेवतात पण तिच्यासारखी स्वच्छता आपण ठेऊ शकत नाही याचे त्यांना जराही वैषम्य वाटत नाही . भावनेचा मुलामा देऊन जराशी अस्वच्छता बरोबर असे समर्थन केले जाते.

अशी माणसं वेडीच असतात. त्यानी त्यांच्या छंदाचा ध्यास घेतलेला असतो . या माणसांमधील सगळीच माणसं मोठी प्रतिथयशी होतील किंवा प्रसिद्धीच्या झोतात येतील असे नाही. जी माणसं मोठी होतात, प्रसिद्ध पावतात त्यांच्या छंदीपणाला सामान्य माणसं कुत्सितपणे हसत नाहीत कारण त्यांना माहित असते जर का आपण त्यांना हसलो तर आपलेच हसे होईल.

आपल्याला लहानपणी शिकवलेले असते 'वेड्या माणसाला हसू नये' पण हीच लहानपणीची शिकवण हुषार माणसं मोठेपणी विसरून जातात. याला काय म्हणावे?


**– कौस्तुभ ताम्हनकर**

९८१९७४५३९३

kdtamhankargmail.com



**गर्दी नसलेले एकमेव ठिकाण**

गर्दी नसलेले एकमेव ठिकाण म्हणजे

**"माहेर"**

**गावाकडंच घर !**

भेटा

www.mahertrip.in

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्भगवद्गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय २ : सांख्ययोग**

**अर्जुन उवाच ।**

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।।

**अविनाशी नित्यवंत पाही ।**
**बांधिला नवचे कहीं।**
**या कारणे सर्व भूतांचे ठायी ।**
**वृथा शोक करूं नये ।।३०।।**

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकपितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ।।

**तू स्वधर्माते जाणसी जरी ।**
**तरी भय धरावयासी नव्हेसी अधिकारी ।**
**धर्म युद्ध म्हणसी तरी ।**
**त्याहुनि क्षत्रियासी अधीक नसे ।।३१।।**

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिन: क्षत्रिया: पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ।।

**कृष्ण म्हणे पार्थासी ।**
**दैवास्तव पावलिया युद्धासी ।**
**जेणे मुक्त स्वर्गद्वार पावसी ।**
**ते युद्धी क्षत्रियासी सुख पाविजे ।।३२।।**

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
तत: स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ।।

**तू आपुले क्षात्रधर्म सांडुनि ।**
**जरी संग्राम न करिसी रणीं ।**
**तरी उत्तम श्रेय हरवुनी । पावसी पापातें ।।३३।।**

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।
संभावितस्य चाकीर्ति: मरणादतिरिच्यते ।।

**अधर्म आणि अपकीर्ति ।**
**जालिया लोक निंदा बोलती ।**
**तुझे वैरी तुज हांसती ।**
**अपकीर्तिपरिस मरण भले ।।३४।।**

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथा: ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।।

**भये करूनी रणींहुनी परतसी ।**
**ते कळेल महारथियासी ।**
**ज्यामध्यें थोरपणें होतासी ।**
**तेथ पावसी लघुत्व ।।३५।।**

अवाच्यवादांश्च बहुन्वदिष्यन्ति तवाहिता: ।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दु:खतरं नु किम् ।।

**लोक बोलो नये तें बोलती ।**
**तुझे सामर्थ्य वैरी निंदिती ।**
**लाज होईल क्षिती । याहुनी दु:ख काय असे ।।३६।।**

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वो भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय: ।।

**मेलिया होईल स्वर्गप्राप्ति ।**
**जालिया होईल पृथ्वीपती ।**
**ऐसे धरूनी चित्तीं । ऊठ अर्जुना युद्धासी ।।३७।।**

## शब्दकोडे माहे जुलै २०२२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | X | ४ | ५ |
| ६ | | X | ७ | ८ | | |
| ९ | | १० | X | ११ | | X |
| | X | १२ | १३ | | X | १४ |
| X | १५ | X | | X | १६ | |
| १७ | | १८ | X | १९ | X | |
| | X | २० | | X | २१ | |
| २२ | | | X | २३ | | X |

**आडवे शब्द :**

१. शिव, महादेव, ४. 'पाय' ला गुजराथी प्रतिशब्द, ६. ओळ, ७. एक प्रकारची बैलगाडी, ९. सांभाळ, जोपासना, ११. श्रवणेंद्रिय, कर्ण, १२. 'देऊ तू नको दुष्ट X X X' (श्लोकाची ओळ पूर्ण करा.), १६. चिक्कार, खूप, १७. तपश्चर्या, १९. भूमी, धरा, २०. पोपट, राघू, २१. दंत, २२. गलबत, तारु, २३. शाई ठेवण्याची बाटली.

**उभे शब्द :**

१. ओवाळण्याचे दीपपात्र, २. बाजूला, खेटून, ३. छाप, ४. वारा, वात, ५. पक्ष, दल, ८. वर्तमानपत्राचा स्तंभ, १०. नूतन, नवीन, १३. शिक्षा, १४. विड्याची पानं तोडण्याचे एक वाकडे हत्यार, १५. तपास, १७. ज्याची शिकार करायची आहे तो प्राणी, १८. उदास, खिन्न.

– सौ. मधुरा संतोष शिधये,
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. विमानाच्या भागांवर मुलामा देण्यासाठी कोणत्या धातूचा वापर करतात? का?
२. भिंगांच्या चष्म्यांचा वापर कोणी व कधी सुरू केला?
३. दार्जिलिंगमध्ये मिळणारी 'झाला' नावाची तिखट चटणी कोणत्या स्थानिक मिरचीच्या प्रकारापासून बनवतात?
४. आपल्या शरीरातील कोणते हार्मोन भुकेची भावना निर्माण करते?
५. एकाच पक्ष्याला दोन डोकी असतील तर त्याला काय म्हणतात?
६. 'बॅटमॅन' ची निर्मिती कोणी केली?
७. लिंबू घातलेल्या व्होडकाला इटलीत काय म्हणतात?
८. लसणाला संस्कृतमध्ये काय म्हणतात?
९. फ्रान्समधील रेशमाच्या किड्यांना कोणता रोग होत असे?
१०. कोणत्या सणामध्ये ओरिसातील मुली ३ दिवस कुठलेही काम करत नाहीत?

(उत्तरे अन्यत्र पहा.) – सौ. मधुरा संतोष शिधये,
मोबा.९८१९७७०९७०

### शब्दकोडे माहे जूनचे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ पा | २ रि | ३ तो | षि | ४ क | X | ५ वि |
| ६ क | ता | र | X | ७ द | ८ रा | रा |
| चं | X | ९ डी | १० र | X | ११ ग | ज |
| १२ द | १३ मा | X | १४ सा | १५ रा | X | मा |
| १६ न | क | टी | X | १७ ज | १८ वा | न |
| X | ड | X | १९ सा | व | ट | X |
| २० स | मे | २१ ट | X | ट | X | २२ ग |
| X | २३ वा | स | २४ र | X | २५ ह | ज |
| २६ श्री | X | २७ र | ज | क | X | रा |

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

## (लेखांक पंधरावा)

अर्थात तो आणि ज्ञानेश्वर दोघं माधुकरी मागायला गेलेले असताना ज्ञानेशांच्या बाबतीत घडलेला प्रसंग म्हणजे समाजाच्या हीनतेची परिसीमा होती. पण अशा कित्येक परिसीमा अजून बघायच्या होत्या. ज्ञानेश्वर तसा जाणता, संयमी. पण त्याचाही संयम सुटला होता. आणि सोपाना तर लहानच होता. त्याच्याही बाबतीत हे घडलंच असतं. आणि तसं झालं असतं तर त्या अजाण बालकाच्या मनावर तो फार मोठा आघात झाला असता. म्हणूनच समाजाच्या विचित्र व्यवहाराची आणि सामाजिक सुकृती आणि निवृत्तीची जाणीव त्याला करून देणं गरजेचं होतं. सोपानानं प्रश्न विचारल्यावर ज्ञानेश्वर काहीच बोलला नाही. तप्त सूर्यासारखा त्याचा चेहरा लाल झाला होता. हृदयात संताप मावत नव्हता. एरवी स्नेहार्द्र असणारे डोळे स्फुल्लिंगासारखे पेटले होते. निवृत्तीदादांनी ज्ञानेशाच्या मस्तकावर हात ठेवला. त्याला थोपटल्यासारखं केलं आणि सोपानाला म्हणाले, ''सोपाना, इकडे ये असा. मी सांगतो तुला तुझा ज्ञानादादा का संतापला ते ! ये इकडे ! हे बघ, मी आणि तुझा ज्ञानादादा माधुकरी मागण्यासाठी गेलो होतो; पण इथल्या ब्रह्मवृंदाच्या मनातून आपणावर टाकलेला बहिष्कार अजून गेलेला नाही. एका घरासमोर उभा राहून ज्ञानेशाने 'ॐ भवति भिक्षां देही' चा पुकारा केला. आतून एक भूदेवी बाहेर आल्या. त्यांच्या हातात भाकरी होती. ती भाकरी त्या माई ज्ञानाच्या झोळीत टाकणार, तोच त्यांचे पती भूदेव बाहेर आले आणि त्या माईंच्या हातातून ती भाकरी हिसकावून घेत म्हणाले, ''काही गरज नाही या संन्याशाच्या मुलाला भाकरी देण्याची आणि भिक्षा घालण्याची. या पाप्याला भाकरी घालण्यापेक्षा त्या कुत्र्याला भाकरी वाढली, तर पुण्य तरी मिळेल !'' असं म्हणत त्यांनी ती भाकरी उकिरड्यावर लोळणाऱ्या एका कुत्र्याला टाकली आणि ज्ञानादादाला तिथून हाकलून दिलं. एवढा मोठा अपमान ज्ञानेश्वराला सहन झाला नाही आणि ''पशू आणि मानव यांतला फरक तुम्हाला कळत नाही, मग तुम्ही कसले ब्राह्मण?'' असा रागारागानं सवाल फेकून ज्ञानेश्वर तिथून निघून आला.'' निवृत्तीनाथानं सगळा प्रसंग जसाच्या तसा सोपानाला सांगितला. सोपानाच्या कपाळावरची शीर एकदम टरारली. त्याचीही मुद्रा लाल झाली. क्षणभरचं; पण अचानक त्याचा चेहरा शांत झाला. त्याला आदल्या दिवशीच्या ज्ञानेशाचं बोलणं आठवलं. निवृत्तीदादाचं समजावणं आठवलं आणि एखाद्या प्रौढ माणसासारखा सोपान बोलायला लागला. ''यात एवढं रागावण्यासारखं काय आहे? हे तर अपेक्षितच होतं. एकदा वादळाला तोंड द्यायचं, असं ठरवल्यावर मग वादळ लहान असो अथवा मोठं, त्याला काय घाबरायचं? आपण ज्ञानोपासक आहोत ना? मग –

**विद्याविनय सम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी**
**शुनि चैव श्वपाके च पण्डिता: समदर्शिना**

असं भगवान श्रीकृष्णानं सांगितलंय ना? आणि ज्ञानदादा, तुला तर अवघी गीता पाठ आहे. मग तुला इतकं संतापायला काय झालं? माधुकरी मागून जगणं, हे जर आपलं विवक्षित कर्म आहे, तर ते करताना तेवढी स्थितप्रज्ञता ठेवली पाहिजे, खरं ना?'' सोपान बोलत होता आणि डोळे विस्फारून निवृत्ती आणि ज्ञानेश्वर ऐकत होते ! 'हा सहा वर्षांचा सोपान, एवढासा चिमुरडा, कालपरवापर्यंत आईने भरवल्याशिवाय न जेवणारा आणि आईची आठवण काढून ढसाढसा रडणारा? हे एवढं शहाणपण याला

आलं कुठून आणि भगवद्गीता हा शिकला तरी कधी? हा सोपानाच बोलतोय, की त्याच्या तोंडून आपले बाबाच बोलताहेत?' एवढे संयमी, शहाणे निवृत्ती आणि ज्ञानेश्वर; पण सोपानाचं बोलणं ऐकून दिङ्मूढ झाले. ज्ञानेश्वराच्या मनात खदखदणारा संताप तर खाडकन खाली आला. सोपानाच्या या बोलण्यावर काय बोलावं, हे दोघांनाही सुचेना. यातून भानावर आला तो निवृत्तीदादा. ''सोपाना, अरे केवढा मोठा झालास रे तू? केवढा समंजसपणे बोलायला लागलास? नाही का रे ज्ञाना?'' निवृत्तीनं ज्ञानेशाची साक्ष काढली. सोपानाच्या बोलण्यानं चकित झालेला ज्ञानेश्वर त्या प्रश्नानं भानावर आला. ''होय रे दादा ! पण सोपाना, कधी रे, कुठं शिकलास?'' ज्ञानेश्वराच्या स्वरातून उत्सुकता लपत नव्हती. ज्ञानादादाचा प्रश्न ऐकून मात्र गीतेचं तत्त्वज्ञान सांगणारा सोपान एकदम लाजला, संकोचला. निवृत्तीदादालाही हाच प्रश्न पडला होता. सोपान आणि भगवद्गीता कधी शिकला? ज्ञानेश्वरानं विचारलेलाच प्रश्न निवृत्ती-दादाच्या चेहऱ्यावरही उमटल्याचं बघून सोपान आणखीनच संकोचला. खाली मान घालून हळूच म्हणाला, ''निवृत्तीदादा, तू आणि ज्ञानादादा पहाटे लवकर उठून घाटावर जात होता, तेव्हा मला बाबांनी संथा दिली आणि बाबांनी मला गीता शिकवली. तुम्हा दोघांएवढी मला अचूक पाठ नाही; पण गीतेचे अठराही अध्याय बाबांनी मला शिकवले आहेत. एवढा संयमी आणि जाणता असणारा ज्ञानादादा अशा क्षुल्लक प्रसंगानं विचलित झालेला पाहिला आणि त्याची समजूत घालण्यासाठी मला जे सुचलं ते मी बोलून गेलो. माझं काही चुकलं असेल, तर मला क्षमा करा !''

सोपानाचं बोलणं ऐकून दोघंही नि:शब्द झाले. 'गंगेच्या घाटावर भल्या पहाटे जाऊन आपण दोघं वेद-उपनिषदांची चर्चा करत होतो, हटयोगाची चर्चा करत होतो. आपल्या माघारी घरी काय चाललंय याची किंचितही तमा आपण केली नाही. आपण स्वार्थी बनलो होतो काय? ज्ञानाची लालसा केवळ आपल्यालाच आहे, असा तर आपला समज झाला नव्हता ना? आपलं थोडंसं चुकलंच; पण बाबा चुकले नाहीत. त्यांनी सोपानाला संथा दिली. विधिवत भगवद्गीता शिकवली. मुखोद्गत करून घेतली. आपण चुकलो,' याचं दोघांनाही वैषम्य वाटलं. निवृत्ती-ज्ञानेशांनी एकमेकांकडे पाहिलं. दोघांच्याही नजरेत तोच भाव होता. दोघांनाही एकमेकांच्या नजरेची भाषा कळली; पण आपण चुकलो, याची खंत वाटली, तरी त्याहीपेक्षा सोपान ज्ञानसंपन्न झाला आहे आणि त्याच ज्ञानानं त्याला समंजस बनवलं होतं, शहाणं बनवलं होतं, या गोष्टीचा अतिशय आनंद निवृत्तीला झाला. सोपानाच्या मनाची जमीन मशागत करून तयार होती. नव्हे, त्यावर काही बीजांकुरही फुटले होते; अंकुरले होते. आता निवृत्तीचं काम सोपं होतं. त्याच्या चेहऱ्यावरही तो आनंद उमटला, तर ज्ञानेश्वराच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहत होता अभिमान ! आपला धाकटा भाऊ, ज्याला आपण अजाण, अबोध समजत होतो, तो आपल्यालाही वेळप्रसंगी समजावण्याइतका समंजस झाला आहे, याबद्दलचा अभिमान ! आता या दोघांना मुक्तीची काळजी नव्हती. बाबांचं अपूर्ण राहिलेलं काम पूर्ण करण्यासाठी आता अथक प्रयत्न करता येणार होते. त्या दोघांना आपल्याकडे अशा अनिमिष नेत्रानं पाहताना बघून सोपान संकोचला. निवृत्तीदादा उठला आणि त्यानं अत्यंत प्रेमभराने सोपानाला आपल्या मिठीत घेतलं. 'भावनेच्या भरात आपण आपल्या मोठ्या भावाला, ज्ञानादादाला समजावून सांगायला गेलो. तेवढी आपली योग्यता नाही - वयाचीही नाही, ज्ञानाचीही नाही आणि अनुभवाचीही नाही. आपल्या हातून हा उद्धटपणा झाला आहे,' या विचारानं संकोचलेला, स्वत:ला किंचित अपराधी मानणारा सोपान, निवृत्तीदादाच्या मिठीत विसावला. त्याच्या अश्वासक स्पर्शानं त्याला दिलासा मिळाला. तोच त्याच्या पाठीवरून ज्ञानदेवाचा अत्यंत मायेचा स्पर्श करणारा हात फिरला आणि पाठोपाठ सोपान

ज्ञानेश्वराच्या मिठीत विसावला. निवृत्ती आणि ज्ञानेश्वर दोघंही जण सोपानाच्या या नव्या रूपाकडे बघून मनातून काहीसे सुखावले. विवेक, विचार आणि वास्तव, यांपासून इतके दिवस लहान असल्यामुळे अनभिज्ञ असणारा, बालिश वागणारा हा सोपान, त्याचं आत्ताचं वागणं-बोलणं तो मोठा होत असल्याचंच द्योतक होतं. सोपानाच्या बोलण्यानं ज्ञानेश्वराचा राग विरघळला, तर निवृत्ती-ज्ञानेशाच्या मिठीत सोपानाचा संकोच. तिघेही प्रसन्न मनाने एकमेकांकडे बघत राहिले. तोच बाहेरून मुक्तीच्या हाका ऐकायला आल्या -

''दादाऽऽ, ज्ञानादादा, सोपानदादा, निवृत्तीदादाऽऽ ! बघा, बघा मला काय सापडलं? मला काय सापडलं? बघा बघा लवकर !'' मुक्तीच्या हाका ऐकून तिघं बाहेर आले. सोपान उत्सुकतेनं पुढे झाला. ''मुक्ते, काय सापडलं गं तुला? बघू बघू !'' म्हणत त्यानं उत्सुकतेनं मुक्तीच्या हातात बघितलं. निवृत्ती आणि ज्ञानाही कुतूहल वाटून पुढे झाले, आणि मुक्तीच्या हातातली वस्तू बघून तिथल्या तिथं थबकले, थिजले. मुक्तीच्या हातात काचेच्या चार बांगड्या होत्या, रुक्मिणीबाईंच्या, त्यांच्या आईच्या ! तिच्या हातातल्या बांगड्या बघून तिघांच्याही काळजात चर्र झालं. उरात हुंदका घुसमटला. डोळ्यांत पाणी उभं राहिलं. यातून सावरला निवृत्ती. ''मुक्ते ! काय आहे हे? हे कुठं मिळालं तुला?'' त्यानं पाणी भरल्या डोळ्यांनी हसण्याचा प्रयत्न करत विचारलं. ''दादा या... या आईच्या बांगड्या आहेत. आपल्या आईच्या !'' उत्तर देताना मुक्तीच्या आवाजात कंप होता. ''अगं हो; पण या तुला कुठं सापडल्या? घरातल्या कोनाड्यात होत्या का?'' ज्ञानेश्वराने प्रसंग हलका करायचा प्रयत्न केला. ''नाही दादा नाही, मला ना त्या... त्या गंगेच्या काठावर वाळूत सापडल्या. गंगेच्या काठावर... आऽऽई, आऽऽई !'' सांगता-सांगता मुक्ती रडू लागली. तिघांचेही कंठ दाटून आले. काय बोलावं, मुक्तीची समजूत कशी काढावी, ते कुणालाच सुचेना. डोळ्यांतल्या अश्रूंनी जणू शब्दांची वाट अडवली. रडता-रडता मुक्तीला हुंदका आवरेना आणि ती सोपानाला बिलगली. त्याच्या गळ्याला मिठी मारून हुंदके देऊन रडू लागली. काही क्षणांपूर्वी मोठा झालेला, समजूतदारपणानं वागणारा सोपान पुन्हा लहान झाला आणि मुक्तीबरोबर तोही स्फुंदू लागला. आता मात्र कठीण होऊन बसलं. काही वेळापूर्वीच सोपानाचं समंजसपणाचं वागणं, बोलणं ऐकून आता मुक्तीची काळजी मिटली, असा सुखद सुस्कारा टाकलेल्या निवृत्ती-ज्ञानेशालाही आता काय करावं सुचेना; पण काहीतरी करणंच भाग होतं. दोघंही पुढे झाले. सोपानाला गळामिठी घालून हुंदके देणाऱ्या मुक्तीला निवृत्तीनं उचलून घेतलं. तिचे डोळे पुसले आणि तिला विचारलं, ''मुक्ता, मला सांग ताई, तू नदीकाठी वाळवंटात कशाला गेली होतीस? गंगेच्या काठावर खेळायला जायचं नाही, असं आईनंच तुला सांगितलंय किनई? मग कशाला तिकडे गेलीस बाळे?'' निवृत्तीच्या या विचारण्यावर मुक्ता आणखीच रडू लागली. आता मात्र सोपान पुढे झाला. रडणाऱ्या मुक्तेचे त्याने डोळे पुसले. तिच्या कपाळावर आलेले केस मागे सारले. आणि तिला म्हणाला, ''मुक्ते, एकटीच गेलीस होय गंगेच्या काठावर? वाळवंटात खेळायला मला का नेलं नाहीस गं? मी पण आलो असतो की तुझ्याबरोबर.'' सोपानाचं बोलणं ऐकून मुक्तीनं रडं आवरलं. म्हणाली, ''दादा, वाळवंटात खेळायला गेले नव्हते. परवा विनायकबुवा घरी येऊन सांगून गेले की, आई-बाबांनी गंगेत समर्पण केलंय. मी ते ऐकलं आणि गंगेच्या काठावर आई सापडेल, म्हणून शोधायला गेले, तर... तर...'' पुढे मुक्ताला बोलवेना. ''तर? तर काय मुक्ते?'' ज्ञानेश्वराने विचारलं.

(क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,**

मो. ८८०५३५५२००

# हिन्दू !

'हिंदू' शब्द 'सिंधु' शब्दाचा अरबी अपभ्रंश आहे असे आपल्याला आतापर्यंत सांगितले गेले आहे. पण खालील लेखामध्ये ते कसे असत्य आणि दिशाभूल करणारे आहे, हे सप्रमाण सिद्ध करून दाखवले आहे.

'हिन्दू' हा शब्द – **हीनं दुष्यति इति हिन्दूः।**

म्हणजे– 'जो अज्ञान आणि हीनतेचा त्याग करतो, त्याला हिन्दू म्हणतात'. 'हिन्दू' हा शब्द अनन्त वर्षांचा प्राचीन असलेला मूळ संस्कृत शब्द आहे.

या संस्कृत शब्दाचा सन्धीविग्रह केल्यास तो हीन + दू = हीनभावना + पासून दूर असलेला, मुक्त असलेला तो हिन्दू होय. आणि आपल्याला हे वारंवार खोटे सांगून फसविले जात होते की, 'सिन्धूचे अपभ्रंशित रूप म्हणजे हिन्दू' हा शब्द आपल्याला मोगलांनी दिला.

खरे म्हणजे 'हिन्दू' या शब्दाची उत्पत्ती वेदकाळापासून आणि वेदातूनच झालेली आहे. म्हणून हिन्दू हा शब्द कुठून आला आणि त्याची उत्पत्ती कशी झाली हे अवश्य जाणून घेऊयात. कारण गेली कित्त्येक वर्षं असा भ्रम पसरविला गेलाय की, 'हिन्दू' हा शब्द 'सिन्धू' या फारसी शब्दापासून निर्माण झालाय .खरे म्हणजे हे धादान्त असत्य आहे.

आपल्या 'वेद' आणि पुराणातही 'हिन्दू' या शब्दाचा उल्लेख सापडतो.

आज आपण 'हिन्दू' या शब्दाची उत्पत्ती कशी झाली ते पाहूयात. 'बृहस्पति अग्यम'(ऋग्वेद)मध्ये हिन्दू शब्दाचा उल्लेख असा आलेला आहे,

**''हिमलयं समारभ्य यावत इन्दुसरोवरं।**
**तं देवनिर्मितं देशं हिन्दुस्थानं प्रचक्षते।''**

म्हणजे– 'हिमालयापासून इन्दू सरोवरा (हिन्दी महासागर) पर्यन्त ईश्वरनिर्मित राष्ट्र म्हणजे हिन्दुस्थान ('हिन्दू' चे स्थान) होय.

'हिन्दू' शब्दाचा उल्लेख असा आलेला आढळतो–

**हीनं च दूष्यतेव्,हिन्दुरित्युच्च ते प्रिये ।**

म्हणजेच–जो अज्ञान आणि हीनत्व यांचा त्याग करतो तो हिन्दू होय. कमीअधिक प्रमाणात असाच श्लोक 'कल्पद्रुमा'तही आढळतो–

**हीनं दुष्यति इति हिन्दूः।**

म्हणजे– जो अज्ञान आणि हीनत्व यांचा त्याग करतो त्याला हिन्दू म्हटले जाते. पारिजात हरण या संस्कृत नाटकात हिन्दूंचा असा उल्लेख आलेला आढळतो–

**''हिनस्ति तपसा पापां,दैहिकां दुष्टं।**
**हेतिभिः शत्रु वर्गंच,स हिन्दुर्भिधियते ।।''**

म्हणजे– जो आपल्या तप:सामर्थ्याने शत्रू,दुष्ट आणि पापाचा नाश करतो,तो हिन्दू होय.

माधव दिग्विजय,मध्ये हिन्दू या शब्दाचा असा उल्लेख केला गेलाय–

**''ओंकारमन्त्रमूलाढ्य,पुनर्जन्म द्रढाश्य:।**
**गौभक्तो भारत:,गरुर्हिन्दुर्हिंसन दूषकः।।''**

म्हणजे– जो ॐकाराला ईश्वररचित रचना मानतो, ज्याची पुनर्जन्म आणि कर्मसिद्धान्त यावर श्रद्धा आहे, जो गौ पालन करतो आणि वाईटाला दूर ठेवतो, तो हिन्दू आहे. केवळ एव्हढेच नव्हे, तर आपल्या ऋग्वेदात (८:२:४१) विवहिन्दू नावाच्या अति पराक्रमी आणि दानी राजाचे वर्णन आलेले आहे, ज्याने ४६००० गाईंचे दान केल्याचा उल्लेख आहे आणि 'ऋग्वेद मंडला'तही त्याचा उल्लेख येतो.

**हिनस्तु दुरिताम् ।**

'वाईटाला दूर सारण्यासाठी सतत प्रयत्नशील असणारे आणि सनातन धर्माचे पालन पोषण करणारे हिन्दूच आहेत.'

**– साभार अग्रेशित...**

# लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात

## (लेखांक चवथा)

**गणित – एक नैसर्गिक शिक्षण प्रक्रिया**

आजी, आई-वडील, सासू-सासरे यांच्या आशीर्वादाने संपदाने एका निरोगी, अद्भूत मुलाला जन्म दिला. संतोष संपदाच्या नैसर्गिक प्रसूतीचा साक्षीदार होता आणि त्यांच्या स्त्रीरोग तज्ज्ञांच्या सूचनेनुसार त्यांच्या बाळाच्या पहिल्या स्तन क्रॉल साठी मदत केली. पहिले फीड मिळवण्यासाठी त्यांच्या बाळाला रांगताना पाहणे हा सर्वात अद्भुत अनुभव होता. संतोष आता तीन महिन्यांपासून त्यांच्या बाळाच्या शारीरिक विकासाची काळजी घेत होता. आजी बाळ आणि संपदा या दोघांना मसाज, आंघोळ, धूप इत्यादी पारंपरिक काळजी पाळत होते. शुध्द गाईचे तूप, ड्रायफ्रुट्स, मेथी, डिंक लाडू इत्यादींसह अतिशय विशिष्ट आहार संपदाला देण्यात आला, जे प्रसूतीनंतर पाठ आणि पुनरुत्पादक अवयवांना बळकट करण्यास मदत करते, यामुळे बाळाला पुरेसे स्तनपान देखील मिळते. संतोषने अवलंबलेल्या सर्व तंत्रांमुळे घरातील वडीलधारी मंडळी फारशी खूश नव्हती, पण बाळ रांगत आहे, चालींना प्रतिसाद देत आहे आणि संतोषसोबत खेळत आहे हे पाहून घरातील सर्वांनी संतोषने दिलेल्या वैज्ञानिक विकासाच्या स्पष्टीकरणास सहमती दर्शवली आणि त्यांना बाळाला दिलेल्या सुरक्षित काळजीबद्दलआत्मविश्वास वाटला.

नवीन प्रसूती रजेच्या नियमांमुळे संपदाला तिच्या बाळासोबत सहा महिने पूर्ण वेळ मिळाला. या वेळेचा उपयोग तिची तब्येत सावरण्यासाठी आणि बाळाशी अप्रतिम संबंध प्रस्थापित करण्यासाठी केला गेला. संतोष, ऑफिसमधून कामावर रुजू झाला आहे आणि तो त्यांच्या बाळाचे रांगणे, वाचन सत्र, आजी-आजोबांसोबत खेळणे इत्यादी फोटो आणि व्हिडिओ त्याच्या सहकाऱ्यांसोबत शेअर करत होता. संतोषने त्याचा मित्र कुणालच्या मदतीने, जो त्याच्या सहा वर्षांच्या चिमुरडीला प्रशिक्षण देत आहे, त्याने गणित – संख्याशास्त्र शिकवण्याची योजना सुरू केली. अभियंता असल्याने, दोघांनाही तार्किक विचारांचे महत्त्व माहित होते आणि ग्लेन डोमनच्या तंत्राने ते प्रभावित झाले होते. डॉट कार्ड वापरून गणिताचे प्रशिक्षण देणारा कुणाल, लहान वयातच संख्या, बेरीज, वजाबाकी याविषयीचे प्रशिक्षण मुलांच्या गणिती क्षमतेवर का आणि कसे काम करते यावर संतोषशी चर्चा करत होता.कुणाल, ज्याला विद्यार्थी असताना गणिताचा त्रास सहन करावा लागला पण जेव्हा त्याला मशीन लर्निंग, आर्टिफिशियल इंटेलिजेंस प्रोजेक्ट्समध्ये काम करावे लागले तेव्हा तो गणिताचा प्रेमी बनला होता, त्याने लहान मुलांना गणित शिकवण्याबाबत एक सादरीकरण तयार केले होते आणि त्यातून अनेक आश्चर्यकारक वैज्ञानिक संशोधन केलेल्या तथ्यांचे दरवाजे संतोष सारख्या नवीन पालकांसाठी उघडले. तो म्हणाला, बहुतेक पालक, जे स्वतः गणिताला घाबरतात, तेच गणिताची भीती आपल्या मुलांमध्ये घालतात. कृपया असे करू नका. गणित ही एक नैसर्गिक शिक्षण प्रक्रिया आहे. झाडावर घरट्यात अंडी घालणारे पक्षी पहा, मोजणी न करता एक अंडे गायब असल्यास पक्ष्याला कळते. गटात राहणारी माकडं, एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी मारताना सर्व माकडं त्याच्यामागे येतात हे त्यांच्या नेत्याला कळतं. पक्षी उंच उडत असताना, आकाराच्या अचूक सममितीने आकाशात एक रचना तयार करतात, जर लीडर पक्ष्याला प्रमाण आणि भूमिती माहित नसेल तर हे कसे शक्य आहे.

कुणाल पुढे म्हणाला, मानव आणि प्राण्यांमध्ये संख्या ज्ञान असते, जी एखाद्या दृश्यातील वस्तूंची

संख्या नोंदवण्याची जन्मजात क्षमता असते. या क्षमतेचा मज्जासंस्थेचा आधार मानला जातो ज्याला संख्या न्यूरॉन्स म्हणतात, जे विशिष्ट संख्यांना प्रतिसाद देतात, मानवी आणि प्राण्यांच्या मेंदूमध्ये आढळतात. शास्त्रज्ञांना मेंदूचा एक भाग सापडला आहे जो त्वरीत प्रमाण ओळखतो. कानाच्या अगदी वर न्यूरॉन्सचा हा एक छोटा पॅच आहे जो आपल्याला एका दृष्टीक्षेपात सांगू देतो. जेव्हा आपण दृश्यएदृष्ट्या काही वस्तू पाहतो, तेव्हा आपल्याला त्यांची मोजणी करण्याची गरज नसते, शास्त्रज्ञांनी उजव्या पॅरिएटल लोबमध्ये (मेंदूच्या वरच्या मागच्या भागात) काही सेंटीमीटर रुंद प्रदेश ओळखला ज्याने संख्यात्मकता मॅप केली. या पॅचच्या एका भागाने (मेंदूच्या मधोमध जवळ) कमी प्रमाणात प्रतिसाद दिला आणि विरुद्ध भागाने (मेंदूच्या बाहेरील भागाच्या जवळ) मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या अभ्यासाचे नेतृत्व करणारे नेदरलँड्समधील उट्रेच युनिव्हर्सिटीचे बेन हार्वे म्हणतात, फक्त एका नजरेत किती गोष्टी आहेत हे आपल्याला सहज कळते.

आपल्या मेंदूमध्ये दोन बाजू किंवा गोलार्ध असतात. मेंदूचा डावा गोलार्ध शिक्षण आणि माहिती प्रक्रिया नियंत्रित करतो. मेंदूचा उजवा गोलार्ध संवेदी प्रक्रिया आणि अभिव्यक्ती नियंत्रित करतो. आधुनिक शिक्षण प्रणाली प्रामुख्याने डाव्या मेंदूच्या मुलांसाठी विकसित केली गेली आहे, ज्यांना रचना करणे, योजना करणे आणि तर्काने समस्या सोडवणे आवडते. शाळा सहसा चांगल्या विश्लेषणात्मक कौशल्यांसह डाव्या विचारसरणीच्या मुलांना शिक्षण पुरवतात. डाव्या मेंदूची कार्यक्षमता भाषा, संख्या, साक्षरता, विश्लेषण आणि वेळ यापैकी एक आहे. आपल्यातील तार्किक, गणना, नियोजन, व्यस्त-मधमाशीचा भाग आपल्याला व्यावहारिक जगात आणि भूतकाळात आणि भविष्यात अडकवून ठेवतो.

उजवा मेंदू, सहानुभूती, अंतर्ज्ञान, कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता यासाठी जबाबदार आहे. जिथे आपण आश्चर्य करतो, स्वप्न पाहतो, कनेक्ट होतो. उजव्या मेंदूच्या सहाय्याने आपण वेळेच्या अंतराळात, पूर्णपणे उपस्थित राहून राहतो. आनंदी शिकण्यासाठी, आपल्याला डाव्या आणि उजव्या मेंदूच्या क्रिया-कलापांमध्ये संतुलन असणे आवश्यक आहे. पूर्व-प्राथमिक शाळांमध्ये आज अवलंबल्या जाणाऱ्यास प्रशिक्षण पद्धती किंवा मॉन्टेसरी पद्धती आपण पाहू शकतो.

जवळजवळ सर्व, गणित करण्यासाठी अंकांवर अवलंबून असतात जे संख्या दर्शवण्यासाठी चिन्हे असतात. मुले त्यांच्या मनाच्या डोळ्यातील वास्तविक प्रमाण/संख्या पाहू शकतात, वास्तविक संख्या वाचण्यास सक्षम असतात. त्यामुळे लहान मुले गणित खूप वेगाने शिकू शकतात. रेन मॅन चित्रपटातील सर्वात प्रसिद्ध दृश्यांपैकी एक उलगडते जेव्हा एक वेट्रेस टूथपिक्सचा बॉक्स जमिनीवर टाकते. डस्टिन हॉफमनचे पात्र, रे, एक नजर टाकते आणि म्हणतो, ८२, ८२, ८२. तो पटकन संख्यांची बेरीज करतो आणि घोषित करतो, अर्थात, एकूण २४६. ही एक नैसर्गिक क्षमता आहे, जर पद्धतशीरपणे विकसित केली तर प्रत्येकजण या क्षमतेचा आनंद घेऊ शकतो.

ग्लेन डोमनने शास्त्रोक्त पद्धतीने डॉट कार्ड्सची रचना केली आहे, जिथे ११' x ११' फ्लॅश कार्ड्सवर ठिपके ठेवता येतील असा कोणताही विशिष्ट पॅटर्न नसावा, परंतु बिंदूंचा आकार, रंग आणि गोलाकार, एक ते शंभर बिंदूपर्यंत समान ठेवला जातो, त्यामुळे मेंदू केवळ Quantity पॅरामीटरवर भर देतो. ठिपक्यांवरील पहिला धडा म्हणजे तुमच्या मुलाची संख्या समज/प्रमाण ओळख वाढवणे. मग बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार असलेली समीकरणे, डॉट्स फ्लॅश कार्ड वापरून तुमच्या मुलाच्या गणिताच्या शिकण्यासाठी समाविष्ट केले जातात. एकदा तुमच्या मुलाने ठिपके quantity ओळखणे आणि समीकरणे पूर्ण केल्यावर, तुम्ही संख्या किंवा अंक गणित फ्लॅश कार्डे सादर करू शकता. यामुळे मुलांना १, २, ३, १०० अंक हाताळण्याच्या शालेय गणिताच्या आवश्यकतांचे पालन करणे सोपे होईल.

बहुतेक मुलांना गणित अवघड वाटतं, कारण ते अमूर्त आहे, सूत्रे, समीकरणे इत्यादींसाठी खूप सराव करावा लागतो, परंतु, जेव्हा मेंदू संख्या हाताळण्यात तत्पर असतो तेव्हा गणित खूप सोपे होते. प्री–प्रायमरी शाळेतही आज वस्तू वापरून लहान संख्या मोजणे शिकवले जाते. पाच फुले, तीन चॉकलेट इ. गणिताची आव्हाने नेहमीच शिकण्याच्या अडचणीमुळे उद्भवत नाहीत. गणिताशी संघर्ष करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांसाठी, यशासाठी आवश्यक असलेला योग्य पाया नसल्यामुळेच.

कुणाल पूर्ण उत्साहात चालू होता आणि त्याचे मित्र थक्क होऊन ऐकत होते. संतोषला त्यांच्या मुलाला गणिताचे प्रशिक्षण देण्याची पूर्ण खात्री होती आणि त्याने कुणालच्या मदतीने प्रशिक्षणाची संपूर्ण योजना तयार करण्यास सुरुवात केली. संतोषला असे वाटत होते की, तो आणि संपदा खूप भाग्यवान आहेत, जेव्हा प्राचीन भारतीय प्रणाली आणि आधुनिक वैज्ञानिक तंत्रे यांचा सुरेख मिलाफ करून त्यांच्या बाळाला प्रेम, काळजी आणि आनंदी खेळाच्या पद्धतींनी पालक म्हणून उत्तम प्रशिक्षण देऊ शकतात.

**– इंद्राणी केळकर,**

मोबा. ९१६४६८५०६७

## सांगा पाहू उत्तरे

१. गंजविरोधी गुणधर्मामुळे 'कॅडमियम' या धातूचा वापर विमानाच्या भागांवर मुलामा देण्यासाठी करतात.

२. भिंगांच्या चष्म्यांचा वापर इटलीतील धर्मगुरुंनी १३ व्या शतकाच्या अखेरीस सुरू केला.

३. दार्जिलिंगमध्ये मिळणारी 'झाला' नावाची तिखट चटणी 'डल्ले' या स्थानिक मिरचीपासून बनवतात.

४. आपल्या शरीरातील 'घ्रेलिन' हे हार्मोन भुकेची भावना निर्माण करते.

५. एकाच पक्ष्याला दोन डोकी असतीतल, तर त्याला 'गंडभेरूंड' असे म्हणतात.

६. 'बॅटमॅन' ची निर्मिती कॉमिक्स लेखक बॉब केन यांनी केली.

७. लिंबू घातलेल्या व्होडकाला इटलीत 'लोमोन चेलो' असं म्हणतात.


८. लसणाला संस्कृतमध्ये 'रसोन' म्हणतात.

९. फ्रान्समधील रेशमाच्या किड्यांना 'पेब्रिन' हा रोग होत असे.

१०. 'रजे' या सणामध्ये ओरिसातील मुली ३ दिवस कुठलेही काम करत नाहीत.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**

मोबा. ९८१९७७०९७०


**कोल्हापूर चित्पावन संघातर्फे**
**नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले**
**यांच्या नवीन पुस्तक प्रकाशनानिमित्त हार्दिक शुभेच्छा !**

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

## सराफी दुकान

**शुक्रवार, दि. 1 जुलै – पुष्य नक्षत्र**
**शुक्रवार, दि. 29 जुलै – पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर,**

**0231–2546585**

# गोदावरी परिक्रमा

**उगम ते समुद्रभेट..**

दक्षिणेतील गंगा म्हणून ओळख असणारी व धार्मिक दृष्ट्या खूप महत्वाची असलेली गोदावरी नदी ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात लांब नदी म्हणून ओळखली जाते. त्र्यंबकेश्वर ते बंगालच्या उपसागराला मिळेपर्यंत १४६५ किमी इतका लांब प्रवास करणाऱ्या गोदावरीचे सुरुवातीला १०-१५ मीटर्स रुंदीचे पात्र राजमहेंद्रीला साडेचार किमी एवढे विस्तीर्ण आहे. महाराष्ट्र, तेलंगणा व आंध्रप्रदेश या तीन राज्यातून प्रवास करत असली तरीही तिच्या खोऱ्यात महाराष्ट्र (४८.६%), तेलंगणा व आंध्रप्रदेश (२३.४%), मध्यप्रदेश व छत्तीसगढ (२०.७), ओडिशा(५.५%) व कर्नाटक (१.४%) राज्यांचा समावेश होतो. तिच्या एकूण खोऱ्याचे क्षेत्रफळ ३,१२,८१२ चौ.किमी.आहे. गोदाकाठच्या प्रदेशाला नदीमुळे वेगळी संस्कृती लाभली आहे. अनेक धार्मिक केंद्रे, धरणे, सिंचन योजना, वीजप्रकल्प आणि त्यातून विकसित झालेली राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक स्थित्यंतरं निर्माण झाली आहे. चला तर मग गोदावरीच्या उगम ते समुद्रभेटीपर्यंतच्या शब्दरूपी परिक्रमेला....

नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर या बारा ज्योतर्लिंगांपैकी एक असलेल्या तीर्थक्षेत्राच्या जवळच असलेल्या ब्रम्हगिरी पर्वतात गोदावरी नदीचा उगम होतो. गौतम ऋषींनी गोहत्येच्या पापमुक्तीसाठी तृणबांध घालून अडवलेली गौतमी म्हणजेच भगवान शंकराच्या जटेतून प्रकटलेली गंगा म्हणजेच गोदावरी, अशी पौराणिक-धार्मिक आख्यायिका सांगितली जाते. त्र्यंबकेश्वर येथील आद्य ज्योतिर्लिंग मंदिर प्राचीनकालीन असल्याचे म्हटले जाते. यादव राजवटीत त्याचा पहिला जीर्णोद्धार झाला. सद्याचे जे मंदिर आहे, त्याचे बांधकाम नानासाहेब पेशव्याच्या काळात सुरु होऊन १७८६ साली पूर्ण झाले. मंदिराजवळून वाहणाऱ्या गोदावरीचा विकास व नागरीकरणाच्या रेट्यामुळे दुर्दैवाने उगमस्थळीच गळा घोटण्यात आला आहे.गोदावरी नदी त्र्यंबकेश्वरमध्ये चक्क अंडरग्राऊंड करण्यात आली.

त्र्यंबकपासून नाशिकपर्यंत नदीचा प्रवास अरुंद व खडकाळ मार्गाने होतो. त्या वाटेवर गोदावरीवर गंगापूर धरण व सोमेश्वर धबधबा लागतो. समुद्रमंथनातून निघालेल्या अमृतकलाशातील अमृतबिंदू पाच ठिकाणी पडले. त्याच पाच ठिकाणांपैकी एक म्हणजे नाशिक. त्यामुळे नाशिक गोदाकाठावर दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. मात्र इ.स. १७६२ साली नाशिकला झालेल्या कुंभमेळ्यात शाहीस्नानाच्या वेळी शैव आणि वैष्णवपंथीय आखाड्यात वर्चस्वावरून संघर्ष झाला होता. त्यात हजारो साधू-भाविकांचे प्राण गेले होते. वाद निकाली काढण्यासाठी अनेक चर्चा, बैठक झाल्या, मात्र तोडगा निघत नव्हता. अखेरीस श्रीमंत माधवराव पेशवे यांनी हस्तक्षेप करून शैवपंथीय त्र्यंबकला कुशावर्त येथे तर वैष्णवपंथीय नाशिकला रामकुंड येथे शाहीस्नान करतील असा निर्णय दिला. तेव्हापासून आजतागायत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी कुंभमेळा भरतो. मात्र अलाहाबाद, हरिद्वार आणि उज्जैन येथे शैव व वैष्णवपंथीय एकत्रच शाहीस्नान करतात. समुद्रसपाटीपासून ७०० मीटर उंचीवर असलेल्या नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये गोदावरी नदीवर सुमारे १०८ कुंड असल्याचे सांगितले जाते. त्यापैकी रामकुंड, कुशावर्त आदी ठिकाणी वर्षभर अनेक धार्मिक विधी सुरू असतात. विकासाच्या नावाखाली नाशिकमध्ये सुद्धा गोदावरीच्या नैसर्गिक प्रवाहाचे काँक्रीटीकरण केल्या गेले. अधिकाधिक भाविकांना लाभ व्हावा म्हणून रामकुंडाजवळ गोदावरी नदी सिमेंट काँक्रटने विभागल्या गेली. आज मात्र दुर्दैवाने त्याचा वापर कपडे धुण्यासाठी व इतर कारणांसाठीच होतो.

नाशिकनंतर आग्नेयेकडे वाहत जाणाऱ्या गोदेला २४ किमी अंतरावर उजव्या बाजूने दारणा नदी तर लगेच काही अंतरावर डाव्या बाजूने कादवा नदी येऊन मिळते. तेथून जवळच मध्यमेश्वर धरण व नांदूर-मध्यमेश्वर पक्षी अभयारण्य आहे. याठिकाणी वर्षभर हजारो पक्ष्यांचं आवागमन होत असतं. पुढे नाशिक जिल्हा संपवून गोदामाय कोपरगाव येथे अहमदनगर जिल्ह्यत प्रवेश करते. आतापर्यंत पश्चिमवाहिनी असलेली गोदावरी इथेच दक्षिणवाहिनी होते. कोपरगावात गोदातीरावर ऐतिहासिक असे गुरु शुक्राचार्यांचं प्रसिद्ध मंदिर आहे.

अहमदनगर-औरंगाबाद जिल्ह्याची सीमा बनत पुढे गोदावरी औरंगाबाद जिल्ह्यात आणि पर्यायाने मराठवाड्यात प्रवेश करते. महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान असलेल्या देवगड येथून वाहत आलेल्या प्रवरा नदीचा गोदेशी जिथे संगम होतो ते ठिकाण म्हणजे प्रवरासंगम. येथूनच १२ किमी अगोदर जंबूद्वीप हे गोदावरीच्या पात्रातील बेट व त्याजवळ असलेले असंख्य महानुभाव पंथीयांचे मंदिरे पाहायला मिळतात. त्यानंतर गोदावरी नदी सातवाहनांची राजधानी असलेल्या प्रतिष्ठाननगरी म्हणजेच पैठणला येते. तेथे भव्यदिव्य असा जायकवाडी म्हणजेच नाथसागर प्रकल्प बांधण्यात आलाय. जायकवाडी हे राज्यातील सर्वात मोठे धरण असून त्याची क्षमता २,९०९ द.ल.घ.मी. इतकी प्रचंड आहे. प्रकल्पाजवळ वीजनिर्मिती प्रकल्प आणि पक्षी अभयारण्य सुद्धा आहे. पैठण येथे आजही सातवाहन काळातील शिल्पे पाहायला मिळतात. पुढे जालना-बीड जिल्ह्याची सीमा बनलेली गोदामायचा बीड जिल्ह्यात वेगवेगळा अनुभव येतो. पांचाळेश्वर येथे गोदानदीपात्रात महानुभाव पंथीयांचे श्रद्धास्थान आहे. पावसाळ्याचे काही दिवस वगळता याठिकाणी दर्शनाला जाता येते. खरतरं नदीकिनाऱ्यावरील गावात वाळूउपसा हा पर्यायाने आलाच. मात्र वाळूउपश्याचे गंभीर फटका बसल्याने बीड जिल्ह्यातील गंगामसला या गावाने वाळूउपश्यावर स्वयंस्फूर्तीने बंदी घालून गोदेला नवसंजीवनी दिली. त्यानंतर शनीच्या साडेतीन पीठांपैकी एक असलेल्या राक्षसभुवन येथे गोदातीरावर दुसऱ्या बाजीरावाने निझामाच्या विरोधात आपली पहिली लढाई जिंकली होती, अशी इतिहासात नोंद आहे. याच बीड जिल्ह्यातील मंजरथ येथे सिंदफणा नदीला आपल्या कवेत घेत गोदावरी नदी पुढे परभणी जिल्ह्यात प्रवेश करते. जिल्ह्यातील शेळगाव येथे गोदावरीवर खडका बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली आहे, ज्याच्या पाण्याचा उपयोग परळी येथील वीजनिर्मिती प्रकल्पासाठी केला जातो. शेळगावनंतर वाड्यांचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गंगाखेड शहरात गोदावरीचा प्रवेश होतो. येथील वाड्यांतील सव्वाहात गल्ली म्हणजेच दोन वाड्यांतील सव्वाहात रुंदीच्या गल्लया प्रसिद्ध आहेत.

त्याचबरोबर गंगाखेड हे संत जनाबाईंचे जन्मस्थान म्हणूनही ओळखले जाते. आपल्या प्रवासात पुढे पूर्णा नदी गोदावरीला डाव्या बाजूने येऊन मिळते आणि गोदावरी नांदेड जिल्ह्यात प्रवेश करते. गोदातीरावर वसलेल्या नांदेड शहरात शिखांचे १० वे गुरु श्री गुरु गोविंदसिंह यांचा गुरुद्वारा प्रसिद्ध आहे. त्यामुळे नांदेड हे शिखांच्या ५ पवित्र ठिकाणांपैकी एक आहे. नांदेड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी जवळच गोदावरी नदीवर विष्णुपुरी बंधारा बांधण्यात आला आहे. तिकडे उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यांचा प्रवास करून व महाराष्ट्र- तेलंगणा राज्याची सीमा बनलेली मांजरा नदी महाराष्ट्र - तेलंगणा राज्याच्या सीमेवर गोदावरीला जाऊन मिळते आणि गोदावरी नदी महाराष्ट्र राज्यातील सुमारे ६६८ किमीचा प्रवास संपवून तेलंगणा राज्यात प्रवेश करते.

**(पुढील मजकूर ऑगस्ट अंकात वाचा...)**

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते**
**चित्पावन संघाच्या कार्यालयात**
**समक्ष / फोन / पत्राद्वारे / व्हॉटस् ॲपद्वारे**
**लवकरात लवकर कळवावेत.**

### ब्राह्मण समाज 'अभिमानास्पद व्यक्ती गौरव !'

# यशवंत दिनकर फडके



- जन्म नाव — यशवंत दिनकर फडके
- जन्म — जानेवारी ३, १९३१<br>सोलापूर, महाराष्ट्र, भारत
- मृत्यू — जानेवारी ११, २००८<br>मुंबई, महाराष्ट्र, भारत
- राष्ट्रीयत्व — भारत. भारतीय
- कार्यक्षेत्र — साहित्य, इतिहास
- भाषा — मराठी
- साहित्य प्रकार — चरित्रलेखन
- विषय — इतिहास
- प्रसिद्ध साहित्य — विसाव्या शतकातील महाराष्ट्र

यशवंत दिनकर फडके (साधारणपणे यदि म्हणून ओळखले जाणारे) जन्म : सोलापूर, (३ जानेवारी १९३१ – ११ जानेवारी २००८) हे एक मराठी चरित्रलेखक, इतिहास संशोधक होते. ते २००० साली बेळगाव मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते.

**जीवन :–**

फडक्यांचे वडील स्वातंत्र्य चळवळीत उतरले होते. स्वातंत्र्य चळवळीमुळे वडिलांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे फडक्यांना शिक्षणासाठी बरीच धडपड करावी लागली. सोलापुरातील 'हरिभाऊ देवकरण हायस्कूल' शाळेत त्यांचे शालेय शिक्षण झाले. हे शिक्षण चालू असताना त्यांनी द्वा. भ. कर्णिकांच्या 'संग्राम' वृत्तपत्रातून लेखनही केले. १९४७ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणाकरता ते पुण्यास गेले. राज्यशास्त्र हा विषय घेऊन पुणे विद्यापीठातून त्यांनी १९५१ साली बी.ए. व १९५३ साली एम.ए. या पदव्या मिळाल्या. पुढे १९७३ साली ते मुंबई विद्यापीठाचे पीएच.डी. धारक झाले.

**वाद प्रतिवाद :–**

१९७० ते १९९७ ह्या थोड्या–अधिक कालखंडात यदिंनी खेळलेल्या काही वादांचे संकलन पुस्तकरूपात प्रकाशित झाले आहे. त्या पुस्तकातील वाद वैचारिक आहेत. ते खेळणाऱ्या व्यक्ती विद्याव्यासंगी आहेत. फक्त त्यांचे दृष्टिकोन भिन्न आहेत. वाद हे भारतीय संस्कृतीला नवीन नाहीत. द्वैत, द्वैताद्वैत, चार्वाक इत्यादी वाद पूर्वी खेळले गेले. साहित्यिक वादही खेळले गेले. वेगवेगळ्या राजकीय भूमिका असलेले वाद नित्य खेळले जात असतातच. वाचन व व्यासंग यामुळेच या वादांत भाग घेणाऱ्या व्यक्ती एकमेकांसमोर ठाकल्या. त्यांचे व्यवसाय भिन्न आहेत. मात्र विचारांचा मुकाबला विचारानेच करायचा हा विचार यामध्ये ठाम दिसून येतो. डॉ. अरुण टिकेकरांनी हंटरवाले फडके हे मार्मिक विशेषण यदिंसाठी वापरले आहे. या वादात उत्तरे प्रत्युत्तरे झडली. कधी लिहिणाऱ्यांचा तोल गेला. मात्र त्यांतून त्या त्या विषयाचे भिन्न पैलू जसे समोर आले तसेच वाद खेळणाऱ्यांचे वादकौशल्यही प्रकट झाले. 'वाद प्रतिवाद – य. दि. फडके' हे वेगळ्या पठडीतले पुस्तक या संकलनातून सिद्ध झाले आहे.पुस्तकाचे संपादन डॉ. वासंती फडके यांनी केले आहे.

प्रकाशक – अक्षर प्रकाशन.

**प्रकाशित साहित्य :– चरित्रलेखन**

अण्णासाहेब लठ्ठे (१९९०), आगरकर (१९९६), र. धों. कर्वे (१९८१), केशवराव जेधे (१९८२), कहाणी नेताजींची – भाग १,२, न्यायालयात मधु लिमये, राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद ते प्रतिभाताई पाटील (२०१७), लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक (१९८५), विष्णूशास्त्री चिपळूणकर (१९८६), शाहू छत्रपती आणि लोकमान्य शोध : बाळगोपाळांचा (१९७७), शोध सावरकरांचा (१९८४), कहाणी सुभाषचंद्रांची (१९९४), सेनापती बापट (१९९९),

**ऐतिहासिक :–**

डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह (१९८६), डॉ. आंबेडकर आणि इंडियन नॅशनल काँग्रेस (१९८६), डॉ. आंबेडकरांचे मारेकरी : अरुण शौरी (१९९९), Constitution of India (इंग्रजी, सहलेखक –राजन श्रीनिवासन (१९८०), Politics and Language (इंग्रजी, १९८०), विसाव्या शतकातील महाराष्ट्र (१९०१ ते १९६३) – खंड १ ते ८, स्वातंत्र्य आंदोलनातील मुसलमान

**ललित/वैचारिक/माहितीपर :–**

आजकालचे राजकारणी, आंबेडकरी चळवळ, केला धर्माचा लिलाव, खरी ही न्यायाची रीति, जम्मू –काश्मीर : स्वायत्तता की स्वातंत्र्य?, दृष्टादृष्ट (१९९२), नथुरामायण, नाही चिरा नाही पणती (२०००), पक्षांतराचे राजकारण, पुरस्कारांचे राजकारण (राजकीय), भारतीय नागरिकत्व, माहितीचा अधिकार, मुंबईचे खरे मालक कोण? (सहलेखिका – डॉ. वासंती फडके), लोकसभा निवडणुका, विसाव्या शतकातील महाराष्ट्र : खंड १ ते ८, व्यक्ती आणि विचार, व्यक्तिरेखा (१९९८), शोधता शोधता (संदर्भग्रंथ) (१९९५), समान नागरी कायदा, संसद : तेव्हा आणि आत्ता, स्मरणरेखा (१९९८)

**य.दि. फडके यांच्याविषयीची पुस्तके :–**

- आधुनिकता आणि परंपरा – एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र : प्रा. य.दि. फडके गौरवग्रंथ (२०००) – संपादक राजेंद्र व्होरा
- वाद प्रतिवाद – य.दि. फडके (संपादक –डॉ. वासंती फडके)

–

## पुरुष कधी रडत नाही

वावरतो मन कठोर करून
मायेचा शब्द बोलत नाही,
अव्यक्त रहातो तो म्हणून
डोळ्यात अश्रु दिसत नाही!

शांतपणे कर्तव्य तो करतो
गाजावाजा घरी करत नाही,
सहज सांगणे टाळतो म्हणून
भाव डोळ्यातला कळत नाही!

सुखी संसाराचे खरे क्रेडीट
कधीच त्याला मिळत नाही,
हसत हसत तो स्विकारतो
नजरेतली खंत लपत नाही!

घरखर्च, हप्ते, फी, बिले
तडजोड यात होतच नाही,
सर्व व्यवस्थित सांभाळतो म्हणून
डोळ्यातली काळजी उमगत नाही!

टार्गेट, बॉस, स्पर्धा, मंदी
चक्रव्युहातून बाहेर येत नाही,
रेस जिंकायला धावत असतो
डोळ्यातली स्वप्न विसरत नाही!

सण समारंभ गप्पा टप्पा
पत्नी मुलांसाठी वेळ नाही,
काळ हातातुन निसटताना
दुःख डोळ्यात लपत नाही!

समोर दिसतो हसरा चेहरा
‘मन’ कुणाला कळत नाही,
किती सहज समजतात सारे
की पुरुष कधी रडत नाही!

**– मंदार पानवलकर.**

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - जुलै २०२२)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्वेता<br>--- | देशस्थ(ऋ) | ९/१२/२०००<br>५.२ | गौतम, मेष, भरणी, द्वितीय, मध्य | B.Sc. | खाजगी नोकरी | मा.प्रा.<br>१५,०००/- | श्रीमती मनिषा बा. कुलकर्णी<br>उस्मानाबाद.<br>९२८४०७४१९१ |
| २. | मधुरा<br>O +ve | देशस्थ(ऋ) | २७/५/९९<br>५.३ | वसिष्ठ, तूळ स्वाती, द्वितीय अंत्य | M. Com Appear | --- | मा.प्रा.<br>--- | अनंत गोपाळ जोशी<br>दत्तवाड, शिरोळ, कोल्हापूर<br>९९६००१७७१४ |
| ३. | मानसी<br>--- | देशस्थ (यजु) | ९/१०/९८<br>५.६ | पाराशर, वृश्चिक रोहिणी, द्वितीय अंत्य | B,E. | खाजगी नोकरी | वा.प्रा.<br>७ लाख | वैभवराव कुलकर्णी<br>नेवासे, अहमदनगर.<br>९५६१२८२९२६ |
| ४. | पूजा<br>AB +ve | देशस्थ (यजु) | १९/१२/९७<br>५.२ | सार्वण, सिंह मघा, प्रथम, अंत्य, राक्षस | B.C.A. | --- | मा.प्रा.<br>--- | मुकुंद पाठक<br>बार्शी.<br>९४२०५४२५७० |
| ५. | डॉ. श्रुती<br>A +ve | देशस्थ(ऋ) | २३/०१/९७<br>५.६ | काश्यप, कर्क पुनर्वसु, चतुर्थ आद्य, देव | BAMS MD Appear | स्वत:चा व्यवसाय वडगाव | मा.प्रा.<br>--- | संजय बुवा<br>वडगांव, कोल्हापूर.<br>९४२३२७३९१० |
| ६. | अमृता<br>A +ve | देशस्थ(ऋ) | ४/१०/९६<br>४.९ | भारद्वाज, मिथुन आर्द्रा, द्वितीय, आद्य | M.Com. | खाजगी नोकरी | मा.प्रा.<br>१७,०००/- | अनंत जोशी<br>दत्तवाड, कोल्हापूर.<br>९९६००१७७१४ |
| ७. | स्नेहल<br>O +ve | कोकणस्थ | २३/१/९५<br>५.४ | कौशिक, कन्या चित्रा, पहिले मध्य, राक्षस | M.Com. | एम.एस. ई.बी. | मा. प्रा.<br>३५,०००/- | स्नेहल मधुकर गोडबोले<br>फुलेवाडी, कोल्हापूर.<br>९५५२३८५८७८ |
| ८. | विशाखा<br>A +ve | देशस्थ | १७/३/९४<br>५.१ | गौतम, मेष, भरणी, चतुर्थ मध्य, मनुष्य | B.E. (E & TC) | पुणे येथे नाकेरी | मा.प्रा.<br>४२,०००/- | वामन पागे<br>कराड, सातारा.<br>९८२२२४३८०७ |
| ९. | प्राची<br>AB +ve | देशस्थ | २१/३/९३<br>५ फूट | भारद्वारज, कुंभ शततारका, ३ रे आद्य, राक्षस | B.E. MBA | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>६५,०००/- | गिरीश शाम राजाज्ञा<br>प्रतिभानगर, कोल्हापूर.<br>९७६४४५२५२५ |
| १०. | उमा<br>O +ve | देशस्थ | ११/०१/९२<br>५.४ | काश्यप, मीन उ.भाद्र., मध्य, मनुष्य | B.Com. | --- | मा.प्रा.<br>--- | श्रीरंग देशपांडे<br>सागरमाळ, कोल्हापूर.<br>९४२२५८१३६३ |

**अश्विनी अनिल कुलकर्णी**
**(देशस्थ)**
(A +ve)

**जन्मतारीख :** १९/११/१९९५
**शिक्षण :** B.E.
**नोकरी :** कोल्हापूर येथे
**मा.प्रा. :** १२,०००/- **उंची :** ५.५
**पत्ता : श्री. अनिल कुलकर्णी**
कळंबा रोड, कोल्हापूर.
मोबा. 8788646527
**अपेक्षा :** अनुरुप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | कन्या | हस्त | ४ थे | आद्य | देव |

**स्वरूपा राम बर्वे**
**(कोकणस्थ)** (  +ve)
**शिक्षण :** M.A. (Psychology) Gold Medalist, Ph.D. Appear

**जन्मतारीख :** ०१/०३/१९९३
**नोकरी :** पुणे येथे
**मा.प्रा. :** ४०,०००/- **उंची :** ५.२
**पत्ता : श्री. राम दामोदार बर्वे**
देवकर पाणंद, कोल्हापूर.
मोबा. ९०७५०९४०३, ७५८८२२८२७२
**अपेक्षा :** निर्व्यसनी, शाकाहारी, पोस्ट ग्रॅज्यु. पुणे अथवा मुंबई प्राधान्य.

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कौशिक | वृषभ | रोहिणी | १ ले | अंत्य | मनुष्य |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - जुलै २०२२)

| अ. क्र. | वरांचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मकरंद O +ve | देशस्थ(ऋ) | २१/११/८९ ५.१० | वसिष्ठ, सिंह पूर्वा, ३ रे,. मध्य, मनुष्य | B.E. | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ३ ते ५ लाख | दिगंबर विनायक शेषाद्री पाचगांव, कोल्हापूर. ८४५९८६२१२४ |
| २. | जयदीप A +ve | देशस्थ | २५/५/९० ५.६ | हरित, वृषभ, मृग, प्रथम मध्य, देव | B.Tech. | नोकरी मुंबई येथे | वा.प्रा. १४.२१ लाख | भावना रामकृष्ण महाजन शिवाजी पेठ, कोल्हापूर. ७०५७७७६२०७ |
| ३. | अभिजीत O +ve | देशस्थ | २/३/९१ ५.१० | अगस्ती, कन्या, उत्तरा, तिसरे आद्य, देव | M.Com. I.T. Course | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. ६५,०००/- | अर्चना अनंत कुलकर्णी कोल्हापूर ७५०७८१२२६९ |
| ४. | सागर B +ve | देशस्थ | १३/७/९२ ५.७ | काश्यप, धनु मूळ, चतुर्थ आद्य, राक्षस | M.E. | मुंबई येथे नोकरी | मा.प्रा. ५०,०००/- | संजीव दत्तात्रय जोशी वाशीनाका, कोल्हापूर. ७७९८६९२११९ |
| ५. | डॉ. पवन O +ve | देशस्थ | २०/११/९३ ५.३ | काश्यप, मकर श्रवण, ४ थे अंत्य, देव | B.M.S. | बेळगाव येथे मेडिकल ऑफिसर | मा.प्रा. ५०,०००/- | डॉ. सुनिल देशपांडे मु.पो.दाटे, ता. चंदगड ९४०३२३२८१३ |
| ६. | अनिकेत O +ve | देशस्थ | २२/७/९४ ५.६ | भारद्वाज, धनु, उत्तराषाढा, १ ले अंत्य, मनुष्य | M.Tech. | पुणे येथे नोकरी | मा.प्रा. ५०,०००/- | अशोक श्रीपाद तेरवाडकर शिवाजी पेठ, कोल्हापूर. ९३७१५०६१७४ |
| ७. | स्वानंद A + ve | कोकणस्थ | ६/७/९५ ५.५ | कौशिक, कन्या चित्रा, प्रथम मध्य, राक्षस | B.E. | पुणे/कोल्हापूर मार्केटींग जॉब | मा.प्रा. ४२,०००/- | अविनाश विष्णू आपटे रिंग रोड, कोल्हापूर. ९४२३०४४२५९१ |
| ८. | सूरज A + ve | वैष्णव | २०/८/९६ ५.१० | गौतम, तूळ स्वाती, अंत्य, देव | B. E. Mech. | नोकरी पुणे येथे | वा.प्रा. ५ लाख | सुनिल प्रभार नाईक कोल्हापूर. ९८९०६६३५७७ |
| ९. | ऋषिकेश A +ve | देशस्थ | २४/२/९७ ५.५ | वसिष्ठ, कन्या उत्तरा, २ रे, आद्य, मनुष्य | B.E. | अंबप येथे नोकरी | वा.प्रा. १.६० लाख | संजय अनंत कुलकर्णी मु.पो.केखले, जि.कोल्हापूर. ९१४६३०७०७० |
| १०. | ऋषिकेश A +ve-- | देशस्थ | ७/९/९७ ५.६ | अत्रि, तूळ स्वाती, ४ थे अंत्य, देव | B.Pharm | नोकरी बंगळूर येथे | मा.प्रा. २५,०००/- | पद्मनाभ बाजीराव टोणपे सातारा. ९४२२६०९०२७ |

**मंगेश मधुकर जेरे (देशस्थ)**
(B +ve)

**जन्मतारीख :** २७/१०/१९८८
**शिक्षण :** B.E. (Mech) P & D PIDCMIT Pune
**नोकरी :** विठ्ठलवाडी, पुणे येथे
**मा.प्रा. :** ३०,०००/- **उंची :** ५.८
**स्थावर :** स्वत:चे घर व जागा
**पत्ता : श्री. मधुकर व्यंकटेश जेरे**
माणगावकर बोळ, इचलकरंजी.
मोबा. 9422046076, 9422532488
**अपेक्षा :** मनमिळाऊ, ग्रॅज्युएट

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | वृषभ | कृतिका | ३ रे | अंत्य | राक्षस |

**प्रभंजन निळकंठ शुक्ल**
देशस्थ (O +ve)

**जन्मतारीख :** ०८/११/१९९५
**शिक्षण :** B.E. (IT) C-DAC
**नोकरी :** PTC Software Pvt. Ltd. Pune
**वा.प्रा. :** ८ लाख **उंची :** ५.८
**पत्ता : श्री. निळकंठ विठ्ठल शुक्ल**
मु.पो.गारगोटी, जि. कोल्हापूर.
मोबा. 9421204654, 7912527875
**अपेक्षा :** अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| विश्वामित्र | वृषभ | कृतिका | ३ रे | अंत्य | राक्षस |

# कोल्हापूर चित्पावन संघातर्फे आयोजित नवस्नेह मासिकाच्या लेखकांचा ‘स्नेहमेळावा’

कोल्हापूर चित्त्पावन संघातर्फे नियमितपणे प्रकाशित होत असलेल्या लोकप्रिय नवस्नेह मासिकास सहकार्य करणाऱ्या संपादक मंडळ, लेखक, कवी, मुद्रक, वितरक इ. सहकारी मंडळींचा एक स्नेहमेळावा शनिवार, दि. ११ जून २०२२ रोजी संघाच्या सभागृहात संपन्न झाला. भगवान श्री परशुरामांच्या मूर्तीची पूजा करून कार्यक्रमास सुरुवात झाली. संघाचे अध्यक्ष श्री. नंदकुमार मराठे यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये अध्यक्षांनी संघाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. ते म्हणाले, ‘कै. द. गो. कानिटकरांच्या प्रेरणेने सुरू केलेल्या नवस्नेह मासिकास आज अनेक चित्पावन कुटुंबात व इतरही समाजात विशेष महत्त्व आले आहे. याचे सर्व श्रेय मासिकाच्या प्रमुख संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांना आहेच. एखादे मासिक सतत बारा महिने व अनेक वर्षे व्यवस्थित चालवणे सोपे नाही. हे कार्य त्यांनी श्री. जोशी सरांनी संपादनाचा कार्यभार सोडल्यानंतर कानिटकरांच्या विनंतीवरून स्विकारले. त्या सर्वांना बरोबर घेऊन मासिकाची यशस्वी वाटचाल करीत आहेत. त्यांना सहाकार्य करणाऱ्यात सर्व उपस्थित व उपस्थित नसलेले लेखक, कवी, व्यंगचित्रकार, मुद्रक व अनेक दृष्य व अदृष्य हात आहेत. या सर्वांचेच संघाच्या वतीने मी स्वागत करतो. यापुढेही असाच स्नेह दाखवून आपल्या नवस्नेहला उत्तम लोकप्रियता मिळवून देतील याची खात्री आहे.’

नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी आत्तापर्यंतच्या नवस्नेहच्या प्रवासाचा थोडक्यात आढवा घेतला. ‘एखादे मासिक लोकप्रिय करण्यासाठी वाचकांच्या मनाचा वेध घेणे तसे अवघडच आहे पण सर्वांच्या सहकार्याने नवस्नेहची चांगली वाटचाल चालू आहे. लोकांना वाचायची सवय लावणे, विविध विषयावर येत असलेल्या रंजक साहित्याने आपले मासिक वाचकांना आवडते आहेच. तरी देखील यासंबधी वाचकांना एक विशेष विनंती करावी वाटते की, त्यांनी आपल्या नवस्नेह मासिकातील लेखासंबंधी मनमोकळ्या प्रतिक्रिया द्याव्यात. योग्य आणि दिशादर्शक प्रतिक्रिया अंकात प्रकाशित केल्या जातील.’ असे त्यांनी सांगितले.

या मेळाव्यात उपस्थितांनीसुध्दा चर्चेत सहभाग घेऊन नवस्नेहविषयी विविध सूचना व संकल्पना संपादक मंडळासमोर ठेवल्या. आभार प्रदर्शन करताना संघाचे संचालक श्री. मकरंद करंदीकर यांनी उपस्थित सर्व साहित्यकारांचे व उपस्थित नसलेल्या परंतू सातत्याने मासिकास निस्वार्थीपणे सहकार्य करणाऱ्या सहकाऱ्यांचे विशेष आभार मानले. उपस्थितांनी लेखनाबरोबर आपले मासिक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहचण्यासाठी मासिकाचे वर्गणीदार वाढवण्याचेही आवाहन केले. या कार्यक्रमानंतर स्नेहभोजन आयोजित केले होते. भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या मेळाव्यास संघाचे कार्यवाह केदार जोशी, सहकार्यवाह श्री. संतोष साने, खजानीस सौ. संगिता आपटे, संचालक श्रीकांत लिमये, तसेच डॉ. सर्वेश सोमण, सौ. किरण फडणीस, राधा गर्दे, सौ. पल्लवी देशमुख, महेश खाडिलकर, सौ. सुजाता पेंडसे, किशोर देशपांडे, श्री. सुधीर जोशी, डॉ. प्रमिला जरग, डॉ. सुस्मिता गाडगीळ, ॲड. प्रसन्न मालेकर, श्री. सौरभ पाटणकर आदी सन्माननीय सदस्य उपस्थित होते.



**सौ. मंजुश्री गोखले यांची नवी कादंबरी प्रकाशित**

**नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी लिहिलेल्या आणि मेहता प्रकाशनने प्रकाशित केलेल्या संत नामदेव यांच्यावरील ‘भक्ती चंद्र’ या कादंबरीचा प्रकाशन समारंभ नुकतान शनिवार, दि. १८ जून, २०२२ रोजी पुणे येथे संपन्न झाला.**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.